खादी उत्सव
खास दिवाळीनिमित्त खादी सेल प्रदर्शन व विक्री
खादी फुल शर्ट फक्त रु. 350/-
प्युअर कॉटन व्हाईट फुल्ल शर्ट फक्त रु. 420/-
शॉर्ट हाफ कुर्ता फक्त रु. 370/-
नेहरु फुल्ल कुर्ता फक्त रु. 520/-
कडक खादी फुल्ल शर्ट फक्त रु. 500/-
अगदी शिलाईच्या किंमतीत मिळेल.
स्वस्त महासेल सुरु.. मार्केटपेक्षा स्वस्त किंमतीत
सोलापूर हॅन्डलूम बेडशीट,पंचे,भोजन पट्टी,पडदे,सतरंजी, रूमाल व खूप काही
मोठी साईज 46, 48, 50 पर्यंतचे शर्ट उपलब्ध.
खादी हाफ शर्ट फक्त रु. 300/-
खादी कॉटन साडी फक्त रु. 350/-
डिझायनर कुर्तीज् रु. 350/- मध्ये खादी कुर्तीज,पटीयाला, अनारकली,एम्बरायडरी कुर्तीज,स्कर्टस
कडक खादी हाफ शर्ट फक्त रु. 450/-
काँग्रेस भवन, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी, महर्षी कर्वे रोड, अलिबाग
स्थळ : महात्मा गांधी मंदिर वाचनालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पेण-रायगड

रायगड, गुरुवार दि. १६ नोव्हेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

निसर्ग हॉलीडेज
बँकॉक पटाया - ७/१२/२०२३
४ दिवस ५ रात्री
३ स्टार हॉटेल (व्हिसा फ्री)
रुपये- ४५,०००/-
बेंगलोर, मैसुर, तिरुपती, काचिंपूरम, चेन्नई. - २०/११/२०२३
६ रात्री ७ दिवस
१ साईट ट्रेन, १ साईट प्लेन,
रुपये- १५,९९९/-
दिल्ली अमृतसर,कटरा (वैष्णवदेवी), अग्रा मुंबई - १५/१२/२०२३
८ रात्री ९ दिवस
१ साईट प्लेन, १ साईट ट्रेन
रुपये - २२,०००/-
राजस्थान,जयपूर अजमेर, जोधपूर, जैसल्मेर, उदयपूर, माऊट आबू, अहमदाबाद (सरदार वल्लभभाई पटेल स्टॅचू
९ रात्री १० दिवस, २५/१२/२०२३
रुपये- १९,९९९
संपर्क - चंद्रकांत म्हात्रे, ९२६०७४५३२६,अभिनव ठोंबरे- ७७२१९२७४०४
प्रभाकर पटेल- ९८८०२४१६६९ (प्रवाशांनकरीता आकर्षक गिफ्ट)

ठेकेदार, सा.बां.विभाग व रुग्णालय प्रशासन यांची टोलवाटोलवी

जिल्हा रुग्णालय परिसराचा झालाय उकिरडा

रुग्णांसह कर्मचारी, नातेवाईकांचे आरोग्य धोक्यात

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी असलेल्या जिल्हा रुग्णालयाच्या परिसरातच घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याचे चित्र आहे. बालरोग कक्षापासून संपूर्ण इमारतीच्या परिसराला सांडपाण्याने विळखा घातला आहे. दुर्गंधीमुळे रुग्णांसह, कर्मचारी व नातेवाईकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे. स्वच्छता करणाऱ्या एजन्सीबरोबरच सार्वजनिक बांधकाम विभाग, रुग्ण प्रशासन व नगरपरिषद यांच्यात समन्वय नसल्याचा फटका सर्वांना बसत आहे.

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील इमारत चाळीस वर्षांपूर्वी बांधण्यात आली. २५० खाटांच्या इमारतीमध्ये बाह्य रुग्ण कक्षामार्फत सुमारे आठशेपेक्षा अधिक रुग्णांची तपासणी केली जाते. रुग्णांना चांगली सेवा मिळावी, परिसर स्वच्छ रहावा यासाठी गेल्या काही वर्षापासून कंत्राटी कामगार नेमण्यात आले आहेत. नागपूर येथील मे न्यू. ज्वाला सेक्युरिटी फोर्स या एजन्सीमार्फत रुग्णालयाची स्वच्छता राखली जाते. १२ कामगार या ठिकाणी काम करतात. सकाळी आठ ते दुपारी दोन या सहा तासात स्केअर फुट तत्वावर ते काम करतात. मात्र जिल्हा रुग्णालयातील बाह्य कक्षाच्या इमारतीवर ठिकठिकाणी झाडे उगविली आहेत. दुरुस्त केलेले पाईप फुटले आहेत. त्यामुळे सांडपाणी गळती वाढली आहे. ज्या इमारतीमध्ये रुग्णांवर उपचार केले जात आहेत. त्या इमारतीच्या डाव्या बाजूला ➤ पान २ वर

> सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था नाही. पूर्वी ही व्यवस्था होती. परंतु नगरपरिषदेने तो मार्ग बंद केला आहे. रुग्णालयाच्या परिसरात असलेल्या सांडपाण्याची पाहणी करण्यात आली आहे. त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनासोबत चर्चा केली आहे.
> - विशाल देवकर, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग

> नियमित साफसफाई सुरु असते. रुग्णालयाच्या बाहेरची स्वच्छता राखली जाते. आतील स्वच्छता राखण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. तरीदेखील नगरपरिषदेचे कर्मचारी त्याठिकाणी पाहणी करून साफसफाई करतात.
> - अंगाई साळुंखे, मुख्याधिकारी तथा प्रशासक अलिबाग नगरपरिषद

आजचे अग्रलेख

दहा वर्षांचे मौन

वेधक

बस दरीत कोसळून तीस जण ठार

| जम्मू काश्मीर | वृत्तसंस्था |

जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात एक मोठा अपघात झाला आहे. जम्मूहून किश्तवाडला जाणारी बस दरीत कोसळून ३० हून अधिक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. बसमधील अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. दरीत कोसळलेल्या बसमधील प्रवाशांना वाचवण्यासाठी स्थानिक प्रशासनाने बचाव मोहीम हाती घेतली आहे. या बसमधून ५५ जण प्रवास करत होते. जम्मूवरून किश्तवाडला जात असताना बस डोडाजवळ पोहोचली. या भागात खूप उंचावर आणि वळणावळणाचे रस्ते आहेत.

पोलीसाची स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या

| सोलापूर | प्रतिनिधी |

सध्या सर्वत्र दीपावलीची धामधूम सुरू असतानाच भाऊबिजेच्या दिवशी सोलापूर शहरातकेशवनगरपोलीसवसाहतीत एका पोलीस शिपायाने स्वत:वर पिस्तुलाने गोळी झाडून आत्महत्या केली. बुधवारी (दि.१५) सकाळी नऊच्या सुमारास ही घटना घडली. राहुल शिरसट (वय ३५) असे आत्महत्या केलेल्या पोलीस शिपायाचे नाव आहे. सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात नेमणुकीस असलेले राहुल शिरसट हे आयुक्त बंगल्यावर सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. घटनेची माहिती मिळताच अधिकाऱ्यांसह बाजार पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल दाखल झाले. शिरसट यांनी सरकारी पिस्तुलाने स्वतःच्या हनुवटीवर गोळी झाडली. दीपावलीत फटाके फोडले जात असल्यामुळे शिरसट यांनी स्वतःवर गोळी झाडल्याचा आवाज पोलीस वसाहतीत लगेच लक्षात आला नाही.

टोलनाका कर्मचाऱ्यांचे 'समृद्धी'वर आंदोलन

| बुलढाणा | प्रतिनिधी |

समुद्धी महामार्गावरील टोलनाका कर्मचाऱ्यांनी सध्या आंदोलन पुकारल्यामुळे वाहनचालक विनाटोल या मार्गावरुन प्रवास करीत आहेत. कंपनीला लाखोंची कमाई मिळवून देणाऱ्या टोल कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून पगारच मिळाला नाही. किमान दिवाळीत तरी पगार होईल अशी अपेक्षाही फोल ठरली. तसेच त्यांचे पीएफ खातेदेखील उघडण्यात आले नाही. पूर्वी नाका चालविणाऱ्या कंपनीने हे काम दुसऱ्या कंपनीला देऊन टाकले. जेव्हापासून टोलनाका सुरू झाला, तेव्हापासून कर्मचाऱ्यांना पगारपत्र दिलेले नाही. यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमि का घेत बुधवारी टोल नाका आणि काम बंद आंदोलन केले. चालक टोलचा दांडा बाजूला करून टोल न भरता वाहन नेत होते. पगारपत्र नसल्यामुळे पीएफसुद्धा मिळत नाही. दर तीन महिन्याला जर कंपनी बदलत राहिली तर पीएफ कोणती कंपनी देणार असा कर्मचाऱ्यांचा सवाल आहे.

शिक्षकांची दिवाळी कुणबी नोंदींच्या शोधात

| रायगड | प्रतिनिधी |

शाळांमध्ये सहामाही परीक्षा संपून दिवाळीच्या सुट्टीचे वेध लागले असताना आता १९६७ पूर्वीच्या मराठा कुणबी नोंदी तसेच मराठा विद्यार्थ्यांचे दाखले शोधण्याचे काम शिक्षकांना करावे लागत आहे. शिक्षकांना शाळेतील जुनी कागदपत्रे, नोंदी काढून शोध घ्यावा लागणार आहे. दिवाळीच्या सुट्टीतही शाळेत येऊन काम करावे लागत असल्याने शिक्षकांची दिवाळी या नोंदी शोधण्यात गेली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून राज्यात मराठा आरक्षणाचा विषय तापला आहे. राज्य सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात केली आहे. तसेच मराठा समाजाला मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील शाळांतील १९६७ पूर्वीच्या विद्यार्थ्यांचे मराठा कुणबी दाखले व नोंदी शोधण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत.

> **शाळांमध्ये सहामाही परीक्षा असतानाही शिक्षकांना ग्रामपंचायत निवडणुकीची कामे करावी लागली. आता कुणबी नोंदणी शोधण्यासाठी ६० वर्षांपूर्वीची कागदपत्रे तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामाचा शिक्षकांवर ताण पडणार आहे. दिवाळीची सुटी लक्षात घेऊन अनेकांनी गावी व सहलीला जाण्याचे नियोजन केले होते. मात्र, तातडीचे काम आल्याने आता सर्व नियोजन कोलमडणार आहे.**

नोंदी शोधण्यामध्ये काही चुका, उणिवा राहिल्यास, विलंब झाल्यास त्याचाही मनस्ताप शिक्षकांनाच सहन करावा लागणार आहे, असे काही शिक्षकांनी सांगितले. अनेक जुनी कागदपत्रे मोडी लिपीत आहेत. त्यामुळे जुन्या नोंदी शोधण्यासाठी आता मोडी लिपी वाचता येणाऱ्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. तसेच सीमेवरील गावांमध्ये त्या भाषा येणाऱ्यांचा शोध घ्यावा लागत आहे.

जिल्ह्यात सर्व शासकीय विभागाच्या वतीने महसूल अभिलेखे खसारा पत्रक, पाहणी पत्रक, क पत्रक, कुळ नोंदवही, नागरिकांचे राष्ट्रीय रजिस्टर, सन वही व सातबारा उतार, १९५१ नमुना नंबर १, नमुना नंबर २, हक्क नोंद, ➤ पान २ वर

सरकारच्या छाताडावर बसून आरक्षण घेणार-जरांगे

| बीड | वृत्तसंस्था |

आरक्षणाला विरोध करणाऱ्यांबद्दल आम्हाला काहीच बोलायचं नाही. त्यांनी सभा घेतल्या तरीही आम्हाला काहीच अडचण नाही. सरकारने जागं व्हावं आणि मराठा समाजाला त्याच्या हक्काचे ओबीसीमधून आरक्षण द्यावे. राज्यातील प्रत्येक मराठ्यांना आरक्षण मिळणार आहे. कारण आम्ही सरकारच्या छाताडावर बसून आरक्षण घेणार आहोत, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

मराठा आरक्षणासाठी जरांगे यांनी सरकारला २४ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. याच पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर निघाले आहेत. बीडच्या पाली गावात त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आहे. त्याप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी पोलिस अधिक्षकांची भेट घेतली. मराठा समाजातील निष्पाप नागरिकांना खोट्या गुन्ह्यात अडकवू नका, अशी विनंती केली.

मराठा समाजासाठी मी लढत आहे. आता नोंदी मिळत असून मराठा समाजाला १०० टक्के आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे मराठा समाज सगळं कामं सोडून फक्त आता आरक्षणासाठी वेळ देत आहे. लाखोच्या संख्येने मराठा समाज एकत्र येत आहे. ठिकठिकाणी लोकं थांबवून जे काही स्वागत करत आहेत, ती ➤ पान २ वर

चिल्हर नदीत तरुणाचा बुडून मृत्यू

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील चिल्हर नदीमध्ये दारूच्या नशेत पोहण्यासाठी गेलेल्या पाच तरुणांपैकी एकाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. ही घटना अपघात आहे की घातपात याचा तपास कर्जत पोलीस करीत आहेत. पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव यशवंत दुंदा हेले असे आहे. तो तरुण साळोख ग्रामपंचायतमधील खोंडेवाडीत राहणारा आहे.

पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील खोंडेवाडी येथील राहणारा यशवंत हेले हा मोलमजुरी करणारा तरुण भाताची मळणी करण्यासाठी गेला होता. शेतकऱ्याच्या शेतातील भात झोडणीसाठी त्याच्यासोबत पत्नीच्या माहेरच्या गावातील कशेळे दोरेवाडी येथील जिवलग चार मित्र देखील एकत्र होते. शेतातील भात झोडणीचे काम पूर्ण झाले म्हणून दुपारी यशवंत व त्याचे मित्र असे एकूण पाच जण गावाला लागून वाहणाऱ्या चिल्हार नदीवर पार्टी करण्यासाठी म्हणून बसले होते. सोबत आणलेली दारू पिऊन ते सर्वजण नदीच्या पाण्यात पोहण्यासाठी उतरले. दारूच्या नशेत यशवंत व त्याचे मित्र काहीवेळ पाण्यात मौजमजा करीत राहिले.

पोहणे पूर्ण झाल्यावर यशवंत हेलेचे ➤ पान २ वर

रायगडकरांच्या जिवाशी खेळणे थांबवा

माजी आमदार पंडित पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे धूळ, वायू, हवेचे प्रदूषण होत आहे, या प्रदूषणामुळे रायगडकरांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे. पर्यावरणाच्या नावाखाली जेएसडब्ल्यू , रिलायन्स कंपनी वृक्षारोपणाचे उपक्रम राबवित आहेत. मात्र पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या प्रदुषणाकडे लक्ष द्यावे आणि जिवाशी खेळ थांबवावा अशी मागणी माजी आ. पंडित पाटील यांनी केली आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. वर्षाला दहा लाखापेक्षा अधिक पर्यटक जिल्ह्यात येतात. पर्यटनातून जिल्ह्यातील स्थानिकांना रोजगार मिळू लागला आहे. अनेक हॉटेल, कॉटेज व्यवसायिकांना उभारी मिळत आहे. निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या या जिल्ह्याला पर्यटक अधिक पसंती देत असताना, जिल्ह्यातील कंपन्यांमुळे होणाऱ्या प्रदुषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. अलिबाग-पेण मार्गावर प्रवास करताना धूर, धुळीचे साम्राज्य वडखळ परिसरात निर्माण झाले आहे. जेएसडब्ल्यू, रिलायन्स कंपनीच्या परिसरातील गावात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण ➤ पान २ वर

मिनी गोवा म्हणून पर्यटकांची प्रमुख पसंती अलिबागला

प्रवाशांच्या गर्दीने मांडवा जेट्टी गजबजली

| सोगाव | वार्ताहर |

दिवाळीच्या निमित्ताने आलेल्या सलग सुट्टयांमुळे मांडवा जलवाहतूक प्रवासी टर्मिनलवर मुंबईकडून अलिबागच्या दिशेने व अलिबागकडून मुंबईच्या दिशेने मांडवा येथे येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवासी व पर्यटकांची मोठी गर्दी उसळली होती.

हिवाळ्याची चाहूल व आलेल्या दिवाळीच्या सुट्टयांमुळे पर्यटनासाठी मुंबईहुन जवळपास असलेल्या तसेच मिनी गोवा म्हणून पर्यटकांची प्रमुख पसंती अलिबाग व मुरुडला असते. बुधवार १४ नोव्हेंबर रोजी भाऊबीज निमित्ताने कार्यालयातील नोकरदार वर्ग, शालेय विद्यार्थ्यांना सुट्टी असल्याने प्रवाशांनी व पर्यटकांनी मांडवा येथे मोठ्या गर्दी केली होती.

याचवेळी गेट ऑफ इंडिया येथे अलिबागकडे येणाऱ्या प्रवाशी व पर्यटकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते, गेट ऑफ इंडियाच्या ठिकाणी देशविदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर भेट देत असतात. पोलीस प्रशासन सुरक्षेच्या ➤ पान २ वर

रेवस बंदरावर शौचालयात पाण्याची कमतरता

■ एकता मित्रमंडळ नवखारचे बंदर खात्याला निवेदन

। रेवस । वार्ताहर ।

तालुक्यातील सर्वात जुने प्रवाशी बंदर म्हणून ओळखले जाणारे रेवस हे बंदर होय. या बंदरावर काही कामे सुरू आहेत. परंतु बंदरावरील शौचालय हे दुर्लक्षित आहे. येथे पाण्याअभावी प्रवाशांची गैरसोय होत आहे. याबाबत एकता मित्रमंडळ नवखार(मुंबई) या संघटनेने बंदर विभागाला येथील समस्यांबाबत निवेदन दिले आहे.

स्वतंत्र पूर्व काळात रेवस बंदर उभारले गेले. जवळपास ११९ वर्षे जुने बंदर आहे. वीज, पाणी या सारख्या मूलभूत सुविधा देखील कायमस्वरूपी मिळाल्या नाहीत. रेवस- करंजा रो-रो सेवेचे काम सुरू आहे. बाराही महिने सुरू राहणारी रेवस-करंजा प्रवाशी बोट सेवा आणि ८ महिने चालणारी रेवस-मुंबई प्रवाशी बोट सेवा या. या दोन जलवाहतूक सेवे मूळे या बंदरावर दररोज शेकडो प्रवाशांची वर्दळ असते. सर्वात जुने असलेल्या या बंदरावर आजमितीला शौचालय असूनही पाण्या अभावी प्रवाशांची विशेषतः महिलांची मोठी

गैरसोय होत आहे. बंदरावर वीज पुरवठा असला तरी पथदिव्या खाली अंधार अशी परिस्थिती आहे. या बाबत एकता मित्रमंडळ नवखार- मुंबई या संघटनेने बंदर विभागाला तक्रार केली आहे. प्रवाशी तिकिटात जो कर आकारला जातो त्यामुळे प्राथमिक सुविधा देणे हे बंदर विभागाचे कर्तव्य आहे आणि त्यांनी सुविधा दिल्याच पाहिजेत अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

रेवस- मुंबई जलवाहतूक सेवेचे दररोज सुटणाऱ्या बोटींचे वेळापत्रक दिले आहे. दुर्दैवाने या वेळापत्रकानुसार बोटी सोडल्या जात नसल्याने मोठी अडचण होत आहे. वेळ आणि पैसा वाया जातो अशी तक्रार देखील प्रवाशांकडून ऐकायला मिळत आहे. बंदर विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष का करतात असा सवाल उपस्थित केला जात आहे. तातडीने यामध्ये सुधारणा कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यानी केले प्रशासनाचे कौतुक

। खालापूर। वार्ताहर ।

तालुक्यातील चौक येथील इर्शालवाडी दुर्घटनेत कर्जतचे प्रातांधिकारी अजित नैराळे आणि खालापूर तहसिलदार आयुब तांबोळी यांच्यासह त्यांच्या कर्मचाऱ्यांनी चांगले काम केले होते. आपत्तीमध्ये सापडलेल्यांना त्यांनी जीवदान दिले तसेच वेळेत मदतकार्य केले होते. त्यांनी केलेल्या कार्याची दखल मुख्यमंत्री शिंदे यांनी घेत त्यांच्यावर कौतुकाची थाप दिली आहे. प्रशासनाच्या वतीने इर्शालवाडीवरील पुनर्वसन वस्तीत दिवाळी फराळ आणि भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. वर्षभरात शासनातर्फे पक्की घरे देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. तुम्हा सर्व अधिकाऱ्यांच्या इच्छाशक्तीला शासनाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या प्रशस्तीपत्रात नमूद केले आहे.

किल्ले स्पर्धेचे बक्षिस वितरण

स्वरा म्हात्रेने पटकावला प्रथम क्रमांक

। उरण । वार्ताहर ।

वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने शाळकरी मुलांच्या कलेला वाव देणे आणि दिवाळीचा आनंद लुटण्यासाठी किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेतला उदंड प्रतिसाद मिळाला असून ५२ जणांनी सहभाग नोंदवला होता. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व किल्ले हे मुलांनी माती पासून तयार केले होते. बालदिनाचे औचित्य साधून श्री हनुमान मंदिर वशेणी येथे स्पर्धेचे बक्षिस वितरण करण्यात आले.

किल्ले बांधणी स्पर्धेचे परीक्षण मंडळाचे कार्यवाहक मच्छिंद्रनाथ म्हात्रे, संदेश गावंड आणि प्रविण ठाकूर यांनी केले होते. प्रथम क्रमांक- स्वरा संदेश म्हात्रे (प्रतापगड), व्दितीय क्रमांक- साई समाधान म्हात्रे (लोहगड), तृतीय क्रमांक- अर्पित प्रविण पाटील (मुरूड-जंजिरा), उत्तेजनार्थ-दक्ष प्रेमनाथ पाटील (मुरूड जंजिरा), उत्तेजनार्थ- वेदांत प्रविण ठाकूर (पुरंदर), लक्षवेधी-पूर्वा प्रताप पाटील (कर्नाळा), लक्षवेधी- आर्या कृष्णा पाटील (पन्हाळा), लक्षवेदी- चित्रलेखा प्रदिप पाटील (तोरणा), लक्षवेधी- रूपेश रोशन पाटील (प्रतापगड), विशेष सजावट - निशा निलेश पाटील या सर्व सहभागी स्पर्धकांना मंडळाकडून भेटवस्तू देण्यात आल्या. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुरेंद्र म्हात्रे, किशोर म्हात्रे, डॉक्टर रविंद्र गावंड, संदेश गावंड, आदिनाथ पाटील यांचे विशेष योगदान मिळाले. बक्षीस वितरण कार्यक्रमास गणेश खोत, बळीराम म्हात्रे, पंढरीनाथ पाटील, महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनिल ठाकूर, अनंत पाटील, निसर्ग म्हात्रे ,जगन्नाथ म्हात्रे, अनंत तांडेल, राम तांडेल, पुरूषोत्तम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

रायगड जिल्ह्याचा कुस्ती संघ राज्य स्पर्धेसाठी धाराशिवला रवाना

। पेण । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेतर्फे ६५ वी वरिष्ठगट महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा १६ ते २० नोव्हेंबर २०२३ या कालावधीत धाराशिव येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा माती, गादी विभागासाठी निवडण्यात आला.

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष तथा राष्ट्रीय कुस्तीगीर सुभाष घासे व सरचिटणीस तथा शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त मारुती आडकर यांच्या मार्गदर्शनाखाली रवाना झाला आहे. सदर संघास रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा उत्कृष्ट कुस्तीगीर, विचूंबे ग्राम पंचायतचे माजी सरपंच बळीराम पाटील यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

माती विभाग : ५७ किग्रॅ. श्रीनाथ पाटील- अलिबाग, ६१ कि.ग्रॅ. साजन पावसे-पनवेल, ६५ कि.ग्रॅ. ओंकार गायकर- पनवेल, ७० कि.ग्रॅ. किरण ढवळे- पनवेल, ७४ कि.ग्रॅ. श्रेयस करे- पनवेल, ७९ कि.ग्रॅ. जयेश खरमारे-खालापूर, ८६ कि.ग्रॅ. शुभम वरखडे- पनवेल, ९२ कि.ग्रॅ. विकास पावसे-पनवेल, ९७ कि.ग्रॅ. कुणाल शेळके-पनवेल, १२५ कि.ग्रॅ. निमीष घरत- अलिबाग

गादी विभाग:- ५७ कि.ग्रॅ. सोहेल शेख-खालापूर, ६१ कि.ग्रॅ. रविंद्र चौधरी-पनवेल, ६५ कि.ग्रॅ. आदेश मढवी- पनवेल, ७० कि.ग्रॅ. सुनील खंदाळे- खालापूर, ७४ कि.ग्रॅ. दिवेश पालांडे- खालापूर, ७९ कि.ग्रॅ. ओंकार निंबळे- खालापूर, ८६ कि.ग्रॅ. यश कडवे-अलिबाग, ९२ कि.ग्रॅ. शंकर जाधव-पनवेल, ९७ कि.ग्रॅ. कुलदिप पाटील- अलिबाग, १२५ कि.ग्रॅ. ऋषिकेश देशमुख- खालापूर. संघ व्यवस्थापक- प्रविण भोपी- पनवेल.

ऑनलाईन लिप्स्टीक पडली महागात

पनवेल : कळंबोलीत राहणाऱ्या एका महिला डॉक्टरला ऑनलाईन लिप्स्टीक मागवणे चांगलेच महागात पडले आहे. सायबर चोरांनी या महिलेल्या पाठवलेल्या लिंकवर संपूर्ण माहिती भरण्यास सांगून खात्यातून एक लाखांची रक्कम दुसऱ्या खात्यात परस्पर वळती करून घेतली आहे. याप्रकरणी कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळंबोलीतील महिला डॉक्टर एका खासगी रुग्णालयात कामाला आहे. या महिलेने ऑनलाईन लिप्स्टिक ऑर्डर केली होती. पार्सल मिळवण्यासाठी तिने ब्ल्यु डार्ट एजन्सीला संपर्क साधून चौकशी केली होती. या डॉक्टरला सायबर चोरट्यांनी संपर्क साधून तिचे पार्सल होल्डवर ठेवल्याचे सांगितले.

■ भाऊबीज सणानिमित्त पनवेल एसटी आगारात प्रवाशांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. (छायाचित्र : राजेश डांगळे)

वनवासी कल्याण आश्रमचे वतीने आदिवासी वाडीवर फराळ वाटप

। उरण । वार्ताहर ।

हिंदू सणदीपावली, लक्ष्मीपूजन निमित्त दिवाळी मिठाई वाटप ,कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पिरवाडी वाडीवर नागाव ग्रामपंचायत माजी सरपंच हरेश कातकरी,सूरज थवले यांचे मोलाचे सहकार्य लाभले या प्रसंगी वनवासी कल्याण आश्रम चे अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी हिंदूधर्मात असलेल्या दिवाळी सणाचे महत्व सांगितले ,वनवासी कल्याण आश्रम आपल्या वड्यांवरील विद्यार्थ्यां चे शिक्षणासाठी नेहमीच पुढाकार घेत असून ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणात आर्थिक अडचण येत असेल त्यांचा आर्थिक भार वनवासी कल्याण आश्रम उचलेल असे सांगितले, तसेच२५ नोव्हेंबर रोजी निघणाऱ्या कल्याण आश्रम चे जनजाती सुरक्षा मंचाच्या डी लिस्टिंग मोर्चाची माहिती उपस्थितांना दिली, आणि मोठ्या प्रमाणात मुंबईत होणाऱ्या या मोर्चाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

शिवसेना उरणच्या वतीने संगीतमय कार्यक्रम

। उरण । वार्ताहर ।

मंगळवार १४ नोव्हेंबर २०२३ रोजी दिवाळी पाडव्यानिमित्त माजी आमदार तथा रायगड जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांनी 'दिवाळी संध्या' या संगीत गायनाचा कार्यक्रम आयोजीत केला होता. या कार्यक्रमाला प्रेक्षकांनी गर्दी केली होती. कलाकारांनी सादर केलेल्या विविध गाण्यांनी उरणकर मंत्रमुग्ध झाले.

संगीत विशारद कीर्ती रमेश गोंधळी यांची कन्या आसावरी गोंधळी तसेच युगांती पाटील, प्रेरणा पाटील, अंजली म्हात्रे, संस्कृती मोकल व अवंती गोगटे यांच्या सुमधुर गायनाने उरणकर मंत्रमुग्ध झाले. त्यांना महेश घाटे, मधुकर घोगडे, भूषण गायकर यांनी संगीत साथ दिली, तर कार्यक्रमाचे उत्तम निवेदन केशव साळवी यांनी केले. सदर कार्यक्रमात बंदिश,भक्तीगीते व भावगीते सादर करून उरणकरांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाला उरणकरांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला होता.

उरणकर नागरिक झाले मंत्रमुग्ध

कार्यक्रमाला माजी आमदार मनोहर भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, उपतालुका संघटक के.एम.घरत, नगरसेवक अतुल ठाकूर, निलेश भोईर, शहर संघटक दिलीप रहाळकर, महेश वर्तक, प्रवीण मुकादम, अल्पसंख्यांक सेलचे विधानसभा अध्यक्ष एजाज मुकादम, शहर अध्यक्ष मुमताज भाटकर, उपाध्यक्ष सायरा खान, शाखा संघटिका रुकसना सय्यद, जेष्ठ कार्यकर्ते मनोज पाटील, सुधाकर पाटील, संतोष पवार, कामगार नेते गणेश घरत, शिक्षक सेनेचे कौशिक ठाकूर, महेश गावंड, रमणीक म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार प्रवीण पुरो, जेष्ठ पत्रकार घनश्याम कडू, पवार, पत्रकार विठ्ठल ममतावादे, विधी व न्याय सेलचे उपाध्यक्ष मच्छिंद्रनाथ घरत, सोशल मीडियाचे समन्वयक नितीन ठाकूर, ग्राहक संरक्षण कक्षाचे शहर संघटक संदीप जाधव यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

गाडेश्वर देहरंग पाड्यात दिवाळी साजरी

। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।

सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या नवी मुंबई करावे येथील दुर्गा फाऊंडेशनतर्फे पनवेलमधील गाडेश्वर व देहरंग या आदिवासीपाड्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थांबरोबर दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना भेटवस्तूचे वाटप करण्यात आले.

प्रत्येकजण दिवाळी आपल्यापरीने साजरी करत असतो. मात्र आदिवासी पाड्यात मात्र मूलभूत गरजांसाठी नागरीकांना वणवण फिरावे लागते. हीच बाब ओळखत फाऊंडेशनच्या संस्थापिका

दुर्गा फाऊंडेशनचा उपक्रम

अध्यक्षा शोभा भोईर यांनी आदीवासीपाड्यात दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पनवेलमधील गाडेश्वर व देहरंग पाड्यात मुलांना फराळ, दिवे, रांगोळी, फटाके वाटप करण्यात आले. या भेटवस्तूंनी विद्यार्थांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि समाधानाचे भाव दिसुन आले. यावेळी फाऊंडेशनचे सचीव ध्रुव भोईर, खारघर अध्यक्षा रसिका म्हात्रे, नवी मुंबई अध्यक्षा हेमलता खंदारे आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

जिल्हा रुग्णालय परिसराचा झालाय उकिरडा

सांडपाण्यामुळे तळे निर्माण झाले आहे. बाजूला असलेल्या बालरुग्ण कक्षात नाक दाबून ये- जा करावी लागत आहे. सांडपाण्यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत संबंधित ठेकेदाराला विचारणा केल्यावर ही जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे, असे तो सांगतो. तर जिल्हा सामान्य रुग्णालयातील प्रशासनाकडे विचारणा केल्यावर ठेकेदाराकडे बोट दाखविले जात आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग नगरपरिषदेवर जबाबदारी ढकलत आहे. सांडपाणी जाण्याचा मार्ग नगरपरिषदेने बंद केल्याचा आरोप होत आहे. तर रुग्ण आणि त्यांचे नातेवाईकच कचरा करतात असे प्रशासनाचे म्हणणे आहे. प्रशासनामध्ये समन्वयाचा अभाव असल्याने त्याचा फटका सर्वसामान्य रुग्णांसह त्यांचे नातेवाईक व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना बसत आहे.

जिल्हा रुग्णालयात दर दिवशी दीडशेहून अधिक कपडे धुतले जातात. त्यानंतर ते मशीनद्वारे सुकविण्याचे काम केले जाते. परंतु गेल्या अनेक महिन्यांपासून कपडे सुकविण्याची मशीन बंद पडली आहे. त्यामुळे कपडे सुकविण्यासाठी गवतावर सुकविण्याची वेळ तेथील कर्मचाऱ्यावर आली आहे. या परिसरात गवत वाढले असून कचरा ठिकठिकाणी पडल्याने स्वच्छतेचा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.

सरकारच्या छाताडावर बसून आरक्षण घेणार-जरांगे

समाजाची वेदना आहे, असे जरांगेनी स्पष्ट केले.

मराठा समाजाने जरी मला नेते म्हणून स्वीकारले असेल, पण मी स्वतःला कधीच नेता मानत नाही. मी फक्त सेवक आहे. नोंदी मिळाल्यापासून समाजात उत्साहाचे वातावरण असून, सरसकट मराठा समाजाला आरक्षण मिळणार असल्याचा आनंद आहे. तब्बल ७० वर्षांपासून मराठा समाजाचे वाटोळं करण्याचे काम झाल्याचे देखील जरांगे म्हणाले.

शिक्षकांची दिवाळी कुणबी नोंदींच्या शोधात

जन्म-मृत्यु रजिस्टर गाव नमुना क्रमांक १४, शैक्षणिक अभिलेखे प्रवेश निर्गम नोंदवही-जनरल रजिस्टर, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अभिलेखे परवाने नोंद वह्या, मळी नोंद वही, ताडी नोंदवही, कारागृह विभागाचे अभिलेख रजिस्टर ऑफ अंडर ट्रायल प्रिझनर, कच्च्या कैद्यांची नोंदवही, पोलीस विभाग गाववारी, गोपनीय रजिस्टर, क्राईम रजिस्टर, अटक पंचनामे व एफआयआर रजिस्टर, सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी खरेदी खत नोंदणी रजिस्टर, डे बुक करार खत, साठेखत, इसार पावती भाडे चिट्ठी, ठोके पत्रक, बटाई पत्रक, दत्तक विधान पत्र, मृत्युपत्र, इच्छापत्र, तडजोड पत्र ई दस्त, भूमि अभिलेख विभाग पक्का बुक, शेतवार पत्रक, वसुली बाकी, उल्ला बुक, रिविजन प्रतिबुक, क्लासेस रजिस्टर व हक्क नोंदणी पत्रक, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व माजी सैनिकांच्या नोंदी, जिल्हा वक्फ अधिकारी यांचे कडील मुंतखब, शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा तपशील आदींची तपासणी सध्या सुरू आहे.

चिल्हर नदीत तरुणाचा बुडून मृत्यू

चार मित्र नदीबाहेर येऊन घरी गेले. घरी गेल्यावर मित्रांपैकी एका मित्राला आठवण झाली आणि यशवंत आपल्यासोबत पाण्याबाहेर आलाच नाही याची आठवण झाली. त्यानंतर ते चौघे पुन्हा यशवंतला शोधण्यासाठी नदीवर पोहचले होते.मात्र अंधार झाल्याने यशवंत नदीच्या पात्रात दिसून आला नाही.गावातील ग्रामस्थ देखील त्याला शोधण्यासाठी नदीवर पोहचले. मात्र यशवंत आढळून आला नाही. स्थानिक ग्राम स्थांनी यशवंत हरवला असल्याची तक्रार कर्जत पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या कशेळे आऊट पोस्ट पोलीस ठाण्यात दिली. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास पोलीसांनी जावून यशवंतचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी पुन्हा एकदा कर्जत पोलिसांनी तपास सुरू केला.त्यावेळी स्थानिक ग्रामस्थांना यशवंत हेले याचा मृतदेह पाण्यात दिसून आला.पाण्यात बुडालेल्या ठिकाणाहून काही अंतरावर मृतदेह पाण्यात सापडला होता. ग्रामस्थांच्या मदतीने पोलिसांनी यशवंतचा मृतदेह पाण्याबाहेर काढून मृतदेह कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी नेला.

दरम्यान,ज्या ठिकाणी ते सर्व तरुण पोहण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी नदी पात्रात पाण्याचा साठा कमी होता.यशवंत हा पट्टीचा पोहणारा असल्याचे ग्रामस्थ सांगत असून चांगला तरुण पाण्यात बुडतो कसा,असा प्रश्न उपस्थित होत आहे.यशवंतच्या मृत्यूबद्दल ग्रामस्थांनी आणि त्याच्या नातेवाईक यांनी संशय व्यक्त केला असून कर्जत पोलिसांनी यशवंतसोबत नदीवर पोहायला गेलेल्या चार मित्रांना ताब्यात घेतले आहे. कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली कशेळे पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी थोरणे आणि राठोड हे तपास करीत आहेत.

रायगडकरांच्या जिवाशी खेळणे थांबवा

झाला आहे. सत्तेवर असलेल्या प्रतिनिधीकडून याबाबत बघ्याची भूमिका घेतली जात आहे. या प्रदुषणामुळे पर्यटनावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील कंपन्यांमार्फत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. मात्र हे उपक्रम फक्त दिखावटी स्वरूपाचे असून प्रत्यक्षात कंपनी व्यवस्थापनांकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याचा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे. प्रदुषणामुळे स्थानिकांसह पर्यटकही त्रस्त होऊ लागले आहेत. याबाबत प्रशासनानेदेखील गांभीर्याने दखल घ्यावी असे पंडित पाटील यांनी सांगितले.

प्रवाशांच्या गर्दीने मांडवा जेट्टी गजबजली

कारणास्तव याठिकाणी येणाऱ्या सर्वांनाच रांगेत सोडते आहेत, परंतु अलिबागच्या दिशेने येणाऱ्या प्रवासी व पर्यटकांना या रांगेत ताटकळत राहावे लागते, त्यामुळे नाहक त्रास तर होतोच शिवाय अधिक वेळ रांगेत गेल्याने व लॉन्चच्या वेळेत न पोहोचल्याने लॉन्च पकडण्यात अडचण होत आहे, तरी मुंबई पोर्ट ट्रस्ट व महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड तसेच पोलीस प्रशासनाने अलिबागच्या दिशेने जाणाऱ्यांची वेगळी रांग लावून प्रवासी व पर्यटकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

पनवेलमध्ये स्वरदीप उजळले

। पनवेल । वार्ताहर ।

अभ्यंगस्नान, फराळ, दिव्यांची रोषणाई इतकंच दिवाळीचं अविभाज्य अंग ठरलेल्या संगीत मैफलीचं आयोजन दीपावलीच्या पूर्वसंध्येला पनवेल कल्चरल असोसिएशन आणि ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, पनवेल येथे करण्यात आलं होतं. यात पं जीतेंद्र अभिषेकी आणि पं. राजन मिश्रा यांचे शिष्य पं. मोहन दरेकर आणि अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या शिष्या दीपिका भिडे-भागवत यांनी आपल्या अनुभवसिद्ध, दमदार गायनाने रसिकांची मने जिंकली. मैफलीच्या सुरुवातीला दीपिका भिडे भागवत यांनी केदार रागातील, झपतालातील 'मालनीया...' ही अश्विनी भिडे-देशपांडे यांची रचना सादर केली. त्यानंतर ते दृत एकतालातील एक बंदिश आणि कुमार गंधर्व यांचं 'गुरूपैया लागो ना..' हे निर्गुणी भजन गायले. मैफलीच्या पूर्वार्धाची समाप्ती करताना त्यांनी 'पद्मनाभा नारायणा..' हे लोकप्रिय पद गाऊन रसिकांची मने जिंकली. मध्यांतरानंतर पं. मोहन दरेकर यांनी भिन्न षड्ज या रागामधील रूपक तालातील 'ऐसी भई मोरी विपत सखी.. ही बंदिश सादर केली. त्यानंतर त्रितालमध्ये 'सखी री मन मोरा.. व त्यानंतर 'याद पिया की आये..' सादर केले. पं. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीतबद्ध केलेलं आणि गाऊन लोकप्रिय केलेलं 'काटा रूते कुणाला..' रसिकांची दाद घेऊन गेलं. त्यानंतर त्यांनी 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल..' हा राम फाटक यांनी संगीतबद्ध केलेला लोकप्रिय अभंग सादर केला. मैफलीची सांगता त्यांनी 'रामनाम ज्याचे मुखी..' या भैरवीने केली. या दोन्ही गायकांना सुयोग्य अशी साथसंगत लाभली होती, हार्मोनियमवर अनंत जोशी यांची तर तबल्यावर किशोर पांडे यांची. याशिवाय पखवाजवर धनंजय खुटले व विविध तालवाद्यांवर समीर कर्वे यांची साथ लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिरुद्ध पेंडसे यांनी केलं.

कार अपघातात चार जण जखमी

पनवेल : मुंबई पुणे महामार्गावरील बोर्ले टोलनाक्याजवळ रात्री पावणे बाराच्या सुमारास एका होंडा कारच्या भीषण अपघातात ४ जण जखमी झाले आहेत. होंडा कार द्रुतगती मार्गावरून मुंबईकडे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. साईड रेलिंगला ठोकर मारून ती कार मधल्या लेनवर आली. या अपघातात अशोक रामचंद्र गवई हे गंभीर झाले असून अशोक मोरे, विनोद तळेगावकर, आणि खान हे किरकोळ जखमी झाले आहेत.

तडीपार गुन्हेगारास पोलिसांनी घेतले ताब्यात

पनवेल : पनवेल परिसरातून तडीपार असलेला एक गुन्हेगार नवीन पनवेल येथे फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी या आरोपीला ताब्यात घेतले आहे. खांदेश्वर पोलिसांच्या रेकॉर्डवरील तडीपार असलेला रोहित गोपाळ गाडे (वय ३० वर्षे) रा. विचुंबे हा नवीन पनवेल सिग्नलच्या रिक्षा स्टॅन्ड येथील पेट्रोल पंपाजवळ उभा आहे, अशी माहिती मिळाली होती. पनवेल शहर पोलीस ठाणे, गुन्हे शाखेच्या पथकातील पोउपनि विनोद लभडे यांनी त्यास ताब्यात घेतले. राहितला दोन वर्षे कालावधीकरीता नवी मुंबईसह रायगड, ठाणे जिल्हयातून हद्दपार केले होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि विनोद लभडे, पोहवा अविनाश गंथडे, पोहवा यशवंत झाजम, पोहवा महेंद्र वायकर, पोहवा कुडावकर व पोना अशोक राठोड यांनी ही कामगिरी केली.

बेपत्ता महिलेचा मृतदेह आढळला विहिरीत

तळा: तळा शहरातील दोन महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या ६५ वर्षीय महिलेचा मृतदेह विहिरीत आढळला. याबाबत सविस्तर वृत्त असे की तळा शहरातील मुंढ्याची वाडी येथील यमुना लक्ष्मण मोरे या मुंढ्याची वाडी येथील घरातून १९ सप्टेंबर रोजी बाहेर पडल्या त्या घरी परतल्या नसल्याने त्यांच्या नातेवाईकांनी त्या हरविल्या असल्याची तक्रार केली होती. त्यावरून तळा पोलिसांनी तपास सुरू ठेवला होता. मंगळवारी मुंढ्याची वाडी गावाबाहेर असलेल्या विहिरीत नागरिकांना काहीतरी तरंगत असताना दिसले ग्रामस्थांनी याबाबत पोलिसांना ताबडतोब कळविले असता तो तरंगणारा मृतदेह दोन महिन्यांपूर्वी बेपत्ता झालेल्या यमुना लक्ष्मण मोरे यांचा असल्याचे सिद्ध झाले.

मौज, मजा आणि वाहतूक कोंडी

● दिवाळीनिमित्त आलेल्या सलग सुट्ट्या या पर्यटकांच्या पथ्यावर पडल्या आहेत. मोठ्या संख्येने पर्यटक वाहने घेऊन आल्याने अलिबाग-वडखळ, अलिबाग-मुरुड मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे वाहनांचा वेग मंदावला होता. (छायाचित्र : संतोष राऊळ)

रिक्षाचालकाला आरटीओचा दणका

। पनवेल । प्रतिनिधी ।

महिला प्रवाशांसोबत बेशिस्त वर्तवणूक, भाडे नाकारणे, मीटरप्रमाणे भाडे न घेणे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे एका रिक्षा चालकाला चांगलेच महागात पडले आहे. दिनेश फडके असे या रिक्षा चालकाचे नाव असून पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाने त्याचा वाहतूक परवाना रद्द करताना २२ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

पनवेलजवळील पळस्पे फाटा येथील मॅरेथॉन या सोसायटीच्या गेट समोरील रिक्षा थांब्यावर महिलांसोबत गैरवर्तणूक होत असल्याची ओरड होत होती. या सोसायटीतील एका महिलेने याबाबतची तक्रार दिल्यानंतर रिक्षाचालक फडके हा महिलांशी उद्धट वर्तन, मनमानी भाडे आकारणी करणे व दमदाटी करीत असल्याची तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीनंतर पनवेल परिवहन कार्यालयाने रिक्षा चालकाला नोटीस बजावून कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. मात्र, कारवाईच्या भीतीने तो पळून गेला होता. अखेर ७ नोव्हेंबरला प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन ठोंबरे व नीलेश धोटे यांच्या पथकातील मोटर वाहन निरीक्षक संजय पाटील व विजया चामे यांनी या रिक्षाचालकाला पकडले. यावेळी चालकाकडे रिक्षा वाहनाचा विमा, वैधता प्रमाणपत्र तसेच परवानाही संपल्याचे उघडकीस आले. त्यामुळे पनवेल आरटीओने फडके याला दंड ठोठावत कारवाई केली आहे.

> रिक्षा चालकांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. सोबत कागदपत्रे, मीटरप्रमाणे भाडे आकारावे. युनिफॉर्म घालावा, भाडे नाकारू नये. रिक्षा चालकांनी गैरवर्तवणूक केल्यास प्रवाशांनी पनवेल प्रादेशिक परिवहन विभागात तक्रार करावी.
>
> - गजानन ठोंबरे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल

'एक दिवा शहिदांना' कार्यक्रमाचे आयोजन

। सुकेळी । वार्ताहर ।

सर्वत्र दिवाळीचा सण उत्साहात साजरा होत असतानाच रोहा तालुक्यातील नागोठणजवळच असलेल्या संकल्प मित्र मंडळ वांगणी यांच्या वतीने एक दिवा शहिदांना या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीरांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. लढतांना प्राण गमावलेल्या भारतीय सैनिकांना यावेळी वंदन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून गडकिल्ले स्पर्धा, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याम ध्ये विजेत्या स्पर्धकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. यावेळी या कार्यक्रमाला जनहित कामगार कर्मचारी महासंघाचे रायगड जिल्हाध्यक्ष, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य एकनाथ ठाकुर, तंटामुक्ती अध्यक्ष शंकर ठाकुर आदी उपस्थित होते.

भाऊबीजनिमित्त भावांना तिखट मेजवानीचा थाट

मटणाच्या दुकानात लांबच लांब रांगा

। उरण । वार्ताहर ।

बहिण-भावांचा नाते अतुट समजले जाते. भाऊबीज हा सण यावर्षी बुधवारी आला आहे. या दिवशी भावांसाठी बहिणींनी तिखट मेजवानीचा बेत आखला होता. त्यामुळे सकाळपासूनच मटण आणि चिकनच्या दुकानांसमोर लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

दीपावली या सणाचा पाचवा दिवस म्हणजे भाऊबीज या दिवशी यमराजाची बहीण यमी हिने आपल्या भावाला म्हणजेच यमराजाला अगत्यपूर्वक जेवायला बोलवले होते. यम आपली बहीण यमी हिच्या घरी जेवायला गेला तिला वस्त्रालंकार इत्यादी वस्तू देऊन तिच्या घरी भोजन केले, अशी पौराणिक कथा आहे. या दिवशी नदीत स्नान करणे अत्यंत पवित्र मानले जाते. असे केल्याने त्याला त्यावर्षी यमापासून भय नसते असा समज आहे. यम आणि यमी या भावा-बहिणीच्या प्रेमाबद्दल हा दिवस साजरा केला जातो. पौराणिक महत्त्व प्राप्त झालेला भाऊबीज सण भारत देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. बहिणीच्या घरी वस्त्रालंकार,भेट वस्तू घेऊन येणाऱ्या भावाला जेवण करून त्याची ओवाळणी करून बहिण-भाऊ अतुट नात्याची सांगड घालून प्रेम वृध्दींगत करतात.

ब्राह्मण सभेच्या दीपसंध्येने जिंकली रसिकांची मने

। पनवेल । प्रतिनिधी ।

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेच्या वतीने दिवाळीच्या निमित्ताने 'दीपसंध्या' हा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. पनवेल येथील फडके नाट्यगृहातील कार्यक्रमाला प्रेक्षकांनी हजेरी लावली होती.

पौरोहित्य, साहित्य, नृत्य, नाट्य व स्वराधना या समूहांच्या वतीने संपन्न झालेले सादरीकरण हे कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. उपस्थितांनी कलाकारांच्या कलेले दाद दिली. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी सचीव मंजुषा भावे यांच्या संयोजनातून पौरोहित्य समूहाने आरती, मंत्र व स्तोत्रपठण केले. नंतर सभासदांच्या साहित्यकृतींनी सजलेल्या शेखर अंबेकर संपादित ''मंत्रपुष्प'' या त्रैमासिकाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. साहित्य साधना समूहाने स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. नृत्यआराधना समूहाच्या सदस्यांनी विविध प्रकारची नृत्ये सादर करताना आपल्या लयबद्ध पदविन्यासाने रसिकांची मने जिंकली. स्वराधना समूहाच्या सदस्यांनी विविध मराठी, हिंदी गीतांचे सुरेल सादरीकरण केले. उपाध्यक्ष विजय मनोहर यांनी संगीत संयोजन केले. नाट्यआराधना समूहाने पु. ल .देशपांडे लिखित तुझे आहे तुजपाशी या नाटकातील एक प्रवेश सादर केला. त्याचे दिग्दर्शन मोहन हिंदूपुर व मिलिंद गांगल यांनी केले. मुग्धा आंबेकर व सानिका केळकर यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. रेणुका दलाल व डॉ. शिल्पा वैशंपायन यांनी गायलेल्या पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली. संस्थेच्या अध्यक्ष दीपाली जोशी, सचीव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे, आरती बोधनकर, विनया वाळिंबे यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्य आणि युवोन्मेष समूह यांनी कार्यक्रमाचे शिस्तबद्ध नियोजन केले.

कामोठेत इंडिया आघाडीचा एकत्र फराळ

शेतकरी कामगार पक्षाचा पुढाकार

। पनवेल । प्रतिनिधी ।

देशभरात इंडिया आघाडीची एकजूट होताना दिसत आहे. पनवेल-उरण मतदार संघात देखील १९ पैकी १३ ग्रामपंचायत इंडिया आघाडीची सत्ता आली. त्यामुळे कार्यकर्त्यांचे मनोबल वाढले आहे. दिवाळीच्या सणाचे औचित्य साधत शेतकरी कामगार पक्षाने इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांसाठी दिवाळी फराळाचे आयोजन केले होते.

शेकापचे कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. कामोठे शहरातील शेकाप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, आम आदमी पार्टी, वंचित बहुजन आघाडी, कामोठे कॉलनी फोरमचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने दिवाळी फराळ या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, काँग्रेस जिल्हा प्रमुख सुदाम पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते सतीश पाटील, माजी नगरसेवका निर्मला म्हात्रे, प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, सखाराम पाटील, शिवसेना रायगड प्रवक्त्या सुवर्णा वाळुंज, शिवसेना पदाधिकारी प्रभाकर गोवारी, रामदास गोवारी, संगीता राऊत, संगीता पवार, आम आदमीचे चिमाजी शिंदे, वंचितचे महेंद्र जाधव, कामोठे कॉलोनी फोरमच्या महिला अध्यक्षा जयश्री झा यांनी दिवाळी फराळाचा आनंद लुटला. त्यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या, तसेच आपली एकजुट अशीच कायम ठेवण्याचा त्यांनी संकल्प केला. दिवाळीच्या फराळाचा गोडवा येणाऱ्या महापालिका निवडणुकीत नक्की दिसेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

दिवाळी फराळचा आस्वाद शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून दरवर्षी घेतला जातो. मात्र यावर्षी आम्ही सर्वच आघाडी आणि सामाजिक संस्थामधील कार्यकर्ते दिवाळी फराळासाठी एकत्र आलो, एकत्र सण साजरे करणे याचा राजकीय अर्थ काढणे योग्य नाही, असे मत आयोजक अमोल शितोळे यांनी व्यक्त केले.

रस्ता सुधारण्यासाठी आम आदमी पार्टीचे उपोषण

पंचक्रोशीच्या वतीने बहिणीने केली भाऊबीज

। पाताळगंगा । वार्ताहर ।

साजगाव ते ताकई रोड या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या मार्गावरून अनेक वाहने तसेच शालेय विद्यार्थी, कामगारांची वर्दळ सुरु असते. त्यांचा प्रवास सुखकर व्हावा, तसेच या रस्त्याचे काम उत्तम प्रकारे व्हावे यासाठी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष डॉ.शेखर जांभळे यांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

भाऊबीज सणाच्या दिवशीच हे उपोषण करण्यात येत असल्याने गावातील महिला पुढे आल्या आहेत. त्यांनी उपोषणकर्ते जांभळे यांचे करुणा दिनेश पाटील यांनी औक्षण करत भाऊबीज साजरी केली. करुणा पाटील या अखिल पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया खालापूरच्या तालुकाध्यक्ष आहेत. जांभळे यांनी साजगाव फाटा येथे उपोषणाला सुरुवात केली आहे. समाज हितासाठी करण्यात येत असलेल्या या आंदोलनाला महिला वर्गाने पाठिंबा दिला आहे. झोपलेल्या अधिकाऱ्यांना जाग आण्यासाठी हे उपोषण करण्यात येत आहे. जांभळे यांनी अनेक आंदोलने करून विविध प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यामुळे या उपोषणाची संबंधित प्रशासन दखल घेईल असा विश्वास ग्रामस्थांना आहे.

खालापूर-पनवेल पायी दिंडीचे आयोजन

। रसायनी । वार्ताहर ।

वारकरी सांप्रदायिक खालापूर-पनवेल पायी कोकण दिंडी ट्रस्ट, मोहोपाडा आळंदी देवाची यांच्यावतीने आळंदी देवाची येथे पायी दिंडीचे आयोजन शुक्रवार १ डिसेंबर ते सोमवार ११ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे. या पायी दिंडीत खालापूर व पनवेल तालुक्यातील वारकरी सहभागी होणार आहेत. वारकरी सांप्रदायाचे आद्य प्रसारक रसायनीतील बाळाराम महाराज कांबेकर यांचे चिरंजीव गुरुवर्य विनायक महाराज कांबेकर, बाळकृष्ण महाराज पाटील चांभार्ली यांच्या मार्गदर्शन लाभणार आहे. शुक्रवारी १ डिसेंबर रोजी आद्य क्रांतीवीर वासूदेव बळवंत फडके व विठ्ठल रखुमाई मंदिर शिरढोण येथून दिंडीचे प्रस्थान होणार आहे. शनिवार २ डिसेंबर नारपोली, ३ डिसेंबर मोहोपाडा असे प्रस्थान करीत पायी दिंडी रविवार १० डिसेंबर रोजी आळंदीत दाखल होईल. यामध्ये दररोज काकड आरती, प्रवचन, हरिपाठ, किर्तन असे कार्यक्रम होतील. सोमवार १२ डिसेंबर रोजी समाधी सोहळ्यानिमित्त काल्याचे किर्तन गुरुवर्य बाळकृष्ण महाराज पाटील यांचे होणार आहे.

ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे

वरिष्ठ दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप

। तळा । वार्ताहर ।

तालुक्यातील शिवसेना (ठाकरे गटा) च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले राजीनामे दिले आहेत. पक्षातील वरिष्ठ नेते दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत हे राजीनामे देण्यात आले आहेत.

तळा तालुक्यात पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत एक ग्रामपंचायत वगळता सर्व ग्राम पंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकला आहे. तालुक्यातील भांनग या फक्त एका ग्रामपंचायतीवर ठाकरे गटाच्या उमेदवार वंदना रामा करण-दळवी या विजयी झाल्या आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतर तालुक्यात सर्व ठिकाणी शिंदे गट आणि राष्ट्रवादीचे वर्चस्व असताना देखील शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार सरपंचपदी निवडून आल्याने सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला होता.

तालुका प्रमुख नाना दळवी, तळा तालुका महिला आघाडी प्रमुख लता मुंढे, शहर प्रमुख नजीर पठाण, तळा तालुका युवा अधिकारी नितीन साळवी, उपतालुका प्रमुख भगवान शिंदे, विभाग प्रमुख विजय कदम, दगडू ठसाळ, युवा प्रमुख आप्पाजी दळवी, शाखा प्रमुख जनार्दन मुंढे, सखाराम करण, सुरेश कदम, नथुराम चव्हाण यांनी राजीनामा दिला आहे. हा राजीनामा पक्षातील काही प्रमुखांवर नाराजी असल्याने हा राजीनामा दिल्याचे बोलल जाते.

या राजीनाम्यानंतरची रणनीती नक्की काय असेल, हे राजीनामे मंजूर होतील तसेच हे नेते इतर पक्षात पक्षप्रवेश करतील का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राजगड किल्ला ठरला अव्वल

पेण : किल्ले तयार करण्याची स्पर्धा नुकतीच पार पडली. यामध्ये सुमारे २१८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.त्यामध्ये प्रथम क्रमांक विराज संजय उंबरे- धावटे (राजगड), द्वितीय क्रमांक विनोद बामूगडे- कुरमुरली (रायगड), तृतीय क्रमांक ऐश्वर्या मनोहर पाटील- बेलवडे यांनी पटकावला, तर चौथ्या क्रमांक दीप संतोष खांडेकर- धावटे (खांदेरी उंदेरी) पाचवा क्रमांक सार्थक संतोष सावंत- माळदेव यांनी मिळाला. सहभागी २१८ स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले आहे. परीक्षक प्रणय मानकवळे, प्रतीक पारखे, प्राध्यापक उदय मानकवळे यांनी केले. वृक्षमित्र उदय शंकर मानकवळे हे गेली १२ वर्षे स्पर्धेचे आयोजन करत आहेत.

दहा वर्षांचे मौन

आर. के. लक्ष्मण हे या देशातल्या सर्वोत्तम व्यंगचित्रकारांपैकी एक होत. त्यांचा कॉमन मॅन हे एक सर्वदूर पोचलेले लोकप्रिय पात्र आहे. कॉमन मॅन त्यांच्या सर्व चित्रांमध्ये उपस्थित असतो. तो गोष्टी पाहत असतो. पण त्यावर तो कधीच एक शब्दही बोलत नाही. बोलतात ते इतर लोक. कॉमन मॅनचे तोंड जणू कायमचे शिवलेले आहे. किंवा परिस्थितीच इतकी विदारक आहे की त्यावर आपण आणखी काय बोलणार असे त्याला वाटत असावे. या कॉमन मॅनची आठवण काढण्याचे कारण म्हणजे भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी यांचा नुकताच सादर झालेला ९६वा वाढदिवस. नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंग इत्यादींनी त्यांची भेट घेतली. त्याची छायाचित्रे सर्वत्र प्रसिध्द झाली. अडवानींचा जन्म १९२७ चा. म्हणजे आणखी चार वर्षांनी ते शंभरी पूर्ण करतील. छायाचित्रात दिसते त्यानुसार व पूर्वी ज्या बातम्या आल्या आहेत त्यानुसार अडवानी अजूनही तसे फिट दिसतात. मोदी व इतर नेते यांनी प्रत्यक्ष भेटीत आणि सोशल मिडियामध्ये त्यांच्या गौरवपर काही शब्द उच्चारले असतील. पण अडवानी त्यावर काहीही बोलललेले दिसत नाही. निदान बातम्यांमध्ये तरी त्याचा काही उल्लेख नाही. शिवाय, एकाही वृत्तपत्र किंवा वृत्तवाहिनीने त्यांच्याशी संवाद साधलेला दिसत नाही. अर्थात ही आजची बाब नाही. अडवानी यांनी गेल्या दहा वर्षांपासून स्वीकारलेले हे मौन आहे. २०१४ मध्ये भाजपला विजय मिळाला तेव्हा पंतप्रधान होण्याचा एक दुबळा प्रयत्न त्यांनी करून पाहिला. पण मोदी त्या शर्यतीत केव्हाच पुढे निघून गेले होते. त्यानंतर त्यांची मार्गदर्शक मंडळात रवानगी झाली. एका प्रसंगात अडवानी यांनी मोदी यांची मोठी मेहरबानी आहे असे उद्गार काढले. त्यावर मोदी यांनी डोळ्यात पाणी आणून त्याला जबाब दिला. तो अडवानींना जणू शेवटचा इशारा होता. त्यानंतर अडवानी कधीही मोदी वा त्यांच्या सरकारसंबंधाने काहीही बोललेले नाहीत.

हरवलेला पक्ष

अडवानींचे हे मौन आर.के. लक्ष्मण यांच्या कॉमन मॅनसारखे आहे. ते सर्व गोष्टी पाहत आहेत. मनातल्या मनात ते बोलतही असतील. पण जाहीरपणे व्यक्त करायला त्यांना काहीही मत नाही. किंबहुना या राजवटीत तशी परवानगीच त्यांना नाही. अडवानींनी स्वातंत्र्यापासून सर्व पंतप्रधानांच्या राजवटी पाहिल्या. आणीबाणीत ते तुरुंगात होते. नंतर जनता राजवटीत ते माहिती प्रसारण खात्याचे मंत्री झाले. पुढे वाजपेयी मंत्रिमंडळात उपपंतप्रधान झाले. अयोध्या प्रश्नी त्यांनी देशभर रथयात्रा काढली. मोदी आणि प्रमोद महाजन त्या यात्रेत व्यवस्थापक म्हणून वावरले. या यात्रेने देशाचे राजकारण बदलून गेले. यात्रेमुळेच देशभर दंगली उसळल्या. अडवानींचे लंकादहन असे त्याचे वर्णन झाले. पुढे १९९२ मध्ये त्यातूनच बाबरी मशीद पाडली गेली. मशीद पाडली तेव्हा अडवानी तेथे होते. एका अर्थाने त्या सर्व संहाराचे ते मुख्य आरोपी होते. पण काळाची चक्रे अशी फिरली की तो संहार हाच पराक्रम म्हणून मिरवला जाऊ लागला. २०१४ च्या निवडणुकीतला विजय हा त्याच कालगतीचा परिणाम होता. पण त्या विजयाचे श्रेय त्यांना मिळाले नाही. उलट ते सत्तेपासून कित्येक कोस दूर फेकले गेले आणि त्यांच्यावर जणू सक्तीचा विजनवास लादला गेला. याच अडवानींनी कधी काळी भाजपला पार्टी विथ डिफरन्स किंवा इतरांपेक्षा वेगळा पक्ष असे म्हटले होते. पण मोदी राजवटीच्या काळात भाजपचे जे स्वरुप समोर आले ते कदाचित अडवानींच्याही कल्पनेच्या पलिकडचे असावे. मोदी सरकारने मिडियाला आपला गुलाम बनवले आहे. इडी आणि सीबीआयच्या साह्याने विरोधकांना खलास करण्याचा प्रयत्न चालू आहे. अदानीसारख्या उद्योगपतींवर खुली खैरात चालू आहे. त्याच्या व्यवहारामध्ये भ्रष्टाचार असल्याचे आरोप झाले तर एक तर दुर्लक्ष केले जात आहे किंवा ते आरोप करणाऱ्यांवरच पोलिसी कारवाई केली जात आहे.

अडवानी अयोध्येत जाणार?

गुजरात दंगलींच्या वेळी तेव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी मोदींना राजधर्म पाळण्याचा सल्ला दिला होता. एकेकाळी गोविंदाचार्यांनी वाजपेयींचा उल्लेख केवळ पक्षाचा मुखवटा असा केला होता. पक्षाचा असली चेहरा रथयात्रा काढणारे अडवानी आणि बाकीचे लोक होते. पण त्या अडवानींनाही मोदींचा आजचा कारभार पाहून नक्की धक्के बसत असतील. अडवानींचे वर्णन एकेकाळी लोहपुरुष म्हणून केले जात असे. आता अमित शाह हे सध्याचे लोहपुरुष आहेत. ते शिवसेना किंवा काँग्रेस ज्या सहजतेने फोडतात आणि ज्या निर्ममपणे इडी आणि सीबीआयचा वापर करतात तो पाहून अडवानी नावाचे लोहपुरुषही गडबडून जात असतील. आपण विरोधी पक्षात नाही याबद्दल कदाचित त्यांना हायसंही वाटत असेल. पण भारतीयांचं आणि भारतीय जनता पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांचं दुर्दैव असं की अडवानी आज घट्ट तोंड मिटून बसले आहेत. ते बोलायला तयार नाहीत. ते आपली खासगी डायरी लिहित असतील तर त्यातच कदाचित आपली मतं ते मांडत असतील. आणखी दोन महिन्यांनी अयोध्येतील राममंदिराचे उद्घाटन होईल. त्याची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. पण यामध्ये कोणाही मुख्यमंत्री वा अन्य नेत्यांना निमंत्रणे देण्यात येणार नाहीत असे जाहीर झाले आहे. याचाच अर्थ प्रसिध्दीचा सर्व झोत नरेंद्र मोदी यांच्यावर राहावा अशा रीतीने आखणी चालू आहे. या कार्यक्रमाला अडवानींना बोलावले जाते का आणि बोलावले तर बोलू दिले जाते का हे पाहणे मनोरंजक ठरेल. अर्थात, बोलू दिले तरी अडवानी फार काही बोलू शकतील अशी स्थिती नाहीच. मोदींच्या राजवटीत आपला आवाज गप्प केला जात असल्याची विरोधकांची तक्रार आहे. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे लालकृष्ण अडवानींचे मौन हे आहे. याच रीतीने मुरलीमनोहर जोशी, उमा भारती हे नेतेही कोषात गेलेले आहेत. मोदींच्या कार्यकाळाप्रमाणेच या नेत्यांच्या मौनालाही आता दहा वर्षे पूर्ण होतील.

विचार

चिनी मालाचा दबक्या पावलांनी शिरकाव

गेल्या अनेक वर्षांपासून चीन सणासुदीच्या काळात भारतीय बाजारपेठेत सुमारे एक लाख कोटी रुपयांचा व्यवसाय करत आहे. अलिकडे मात्र भारताने लादलेल्या काही अटींमुळे चीनने आपले गुप्तहेर भारतीय बाजारपेठेत कामाला लावून आणि इतर अनेक देशांमधील 'शॅडो' कंपन्यांच्या माध्यमातून गुप्तपणे ऑर्डर मिळवण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यांच्या माध्यमातून चीन आपला माल भारतीय बाजारपेठेत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे.

भारतात दिवाळीच्या हंगामात मोठी उलाढाल होत असते. या काळात चीनी उत्पादने मोठ्या प्रमाणात भारतीय बाजारपेठेत येत असतात. चीनने काश्मीर, लडाख, अरुणाचल प्रदेशमध्ये केलेल्या घुसखोरीमुळे तसेच संयुक्त राष्ट्रात आणि जागतिक व्यासपीठावर घेतलेल्या भारतविरोधी भूमिकांमुळे भारतात चीनी मालावर बहिष्कार घालून 'मेक इन इंडिया' मोहिमेला चालना देण्याचे हत्यार गेल्या काही वर्षांपासून उपसले जात आहे. त्याचा किती फायदा होतो, हा संशोधनाचा भाग असला तरी आता बहिष्कारास्त्र निकामी करण्याची नवी चाल चीनने खेळली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चीन सणासुदीच्या काळात भारतीय बाजारपेठेत सुमारे ८५ हजार कोटी ते एक लाख कोटी रुपयांचा व्यवसाय करत आहे; परंतु भारताने लादलेल्या काही अटींमुळे अनेक चीनी कंपन्या आणि त्यांच्या उत्पादनांना भारतीय बाजारपेठेत पोहोचण्याची संधी मिळत नाही. सरकारच्या कठोर नियमांमुळे अनेक कंपन्या अस्वस्थ आहेत. एक लाख कोटी रुपयांचा व्यवसाय हिसकावून घेतल्याने चीन धास्तावला आहे, चिडला आहे. त्याने आपले गुप्तहेर भारतीय बाजारपेठेत उतरवले आहेत. स्थानिक बाजारपेठेत त्यांचा माल विकण्यासाठी गुप्तपणे ऑर्डर मिळवणे हा त्यांचा उद्देश आहे. यासाठी चीनने इतर अनेक देशांमध्ये आपल्या 'शॅडो' कंपन्या स्थापन केल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून चीन आपला माल भारतीय बाजारपेठेत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय व्यापारी जागरूक झाल्यामुळे आणि भारतीय उत्पादनांना अधिक संधी देत असल्याने या सणासुदीच्या हंगामात चीनी वस्तूंना मागणी कमी आहे. यामुळेच चीन चिंतेत आहे. मात्र भारतानेही सावध राहण्याची गरज आहे.

सणासुदीच्या काळात भारतीय गुप्तचर यंत्रणांनी इशारा दिल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यात म्हटले आहे की चीनचे एजंट नेपाळमधील नागरिकांच्या नावाने कागदपत्रे तयार करून घेत आहेत. त्या आधारे ते भारतात प्रवेश करतात. भारतीय बाजारपेठेत घुसण्याचा त्यांचा उद्देश आहे. त्यांना भारतीय कंपन्यांच्या हातून सणाचा हंगाम कोणत्याही प्रकारे हिसकावून घ्यायचा आहे. गेल्या काही वर्षांप्रमाणे यंदाही सणासुदीमध्ये चीनी वस्तूंचा महापूर आला पाहिजे, हा त्यांचा उद्देश आहे. चीनी एजंट भारतीय बाजारपेठेत येत आहेत. ते व्यापाऱ्यांना स्वस्तात माल देण्याचे आमिष दाखवत आहेत. मालाची ऑर्डर घेण्यासाठी ते अनेक प्रकारच्या सवलतींची आश्वासने देत आहेत. व्यापाऱ्यांचे सर्व गणित नफ्याच्या अनुषंगानेच आखले जात असते. पुरेसा नफा मिळत नसल्याने ठराविक व्यवसायात हात न घालणारे अनेक व्यापारी उत्तम नफा समोर दिसताच थोडी धावपळ करुन, जास्त कष्ट उपसून का होईना, दलालांच्या चालींना बळी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच दलाल मंडळींचे व्यापाऱ्यांना भरीस पाडणारे प्रयत्न तपासण्यासाठी स्थानिक सुरक्षा यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे.

विठ्ठल जरांडे

'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' (कॅट) ने चीनच्या अशा कृतींना चोख प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला. 'कॅट'ने सणासुदीच्या काळात स्वस्तात वस्तू विकून उत्तम कमाई करु पाहणाऱ्या आपल्या सर्व सदस्यांना चीनी कंपन्यांच्या जाळ्यात न अडकण्याची सूचना केली आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या 'मेक इन इंडिया' मोहिमेची फळे आता दिसू लागली आहेत. आता बहुतांश वस्तू भारतातच बनवल्या जात आहेत. अशा स्थितीत चीनला फायदा होण्याचे कोणतेही औचित्य नाही. भारतीय बाजारपेठेत चीनी एजंट दाखल झाल्याची चर्चा खरी असेल, तर 'कॅट' त्यासाठी तयार आहे. सर्व व्यापाऱ्यांना कोणत्याही कंपनीशी व्यवहार करण्यापूर्वी त्यांची सर्व कागदपत्रे तपासून घेण्यास सांगण्यात आले आहे. व्यवहार करत असलेल्या कंपनीला भारत सरकारकडून मंजुरी मिळाली आहे की नाही, ती कंपनी जीएसटीसंदर्भातील सर्व अटी पूर्ण करत आहे की नाही आदी बाबींची खातरजमा करण्याबाबत संघटना व्यापाऱ्यांना बजावत आहे. एखाद्या व्यावसायिकाला काही शंका असल्यास त्यांनी संबंधित विभाग किंवा एजन्सीला कळवण्याचा निर्णयही 'कॅट'ने घेतला आहे.

चीन आपला माल भारतीय बाजारपेठेत आणण्यासाठी इतर देशांची मदत घेत असल्याचेही दिसून येत आहे. तैवान, बांगलादेश, नेपाळ, म्यानमार या देशांमध्ये 'शॅडो' कंपन्या स्थापन केल्या जात आहेत. त्यांच्या माध्यमातून ते आपली उत्पादने भारतीय बाजारपेठेत पाठवण्याची तयारी करत आहेत. रक्षाबंधनापासून सुरू होणाऱ्या सणासुदीच्या हंगामात दिवाळीपर्यंत सुमारे तीन लाख कोटी रुपयांचा व्यवसाय अपेक्षित आहे. गेल्या काही काळामध्ये दुष्काळी राज्ये वगळता अन्य बाजारपेठांमध्ये उलाढाल वाढली आहे. गेल्या वर्षी या हंगामात सुमारे अडीच लाख कोटी रुपयांचा व्यापार झाला होता. नवरात्री, रामलीला, दसरा, दुर्गा पूजा, करवा चौथ, धनत्रयोदशी, दिवाळी, गोवर्धन पूजा, भाई दूज, छठपूजा आणि तुळशीविवाह या सणांचा हंगाम असतो. या हंगामात ग्राहकांच्या मागणीनुसार देशभरातील व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात माल उपलब्ध करून देण्याची मोठी तयारी केली आहे. भारतातील बाजारपेठांमध्ये किरकोळ विक्रीला हातभार लावणारे अंदाजे ६० कोटी ग्राहक आहेत. या अंदाजानुसार प्रति व्यक्ती केवळ पाच हजार रुपये खर्चाचा अंदाज लावला तर तीन लाख कोटी रुपयांचा आकडा अगदी सहज गाठता येऊ शकतो. या पार्श्वभूमीवर घरगुती वस्तू, उपकरणे, भेटवस्तू, कपडे, दागिने, नकली दागिने, भांडी, सजावटीच्या वस्तू, फर्निचर आणि फिक्श्चर, भांडी, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स, मोबाईल, लॅपटॉप, संगणक आणि उपकरणे, इलेक्ट्रिकल वस्तू, मिठाई आदी वस्तूंच्या खरेदीसाठी ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात खर्च करणे अपेक्षित आहे. इथेच चीनी वस्तूंना मोठी बाजारपेठ मिळते. त्यामुळे त्यांची विक्री करण्यासाठी बाजारपेठेत शिरकाव करणाऱ्या दलालांचा प्रयत्न सुरु होतो.

देहरादूनच्या विविध बाजारपेठांमध्ये चीनी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याची मोहीम सुरू झाली आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये चीनी वस्तूंच्या व्यवसायात घट झाल्यानंतर या दिवाळीमध्ये पुन्हा त्यांची मागणी वाढली आहे. चीनमध्ये उत्पादित इलेक्ट्रिक झुंबर आणि इतर सजावटीच्या वस्तू मुबलक प्रमाणात विकल्या जात आहेत. सर्वसामान्यांची दिशाभूल करण्यासाठी चीनी वस्तूंच्या बॉक्सवर 'मेरा भारत महान'सारखी घोषवाक्ये छापून विक्री केली जात आहे. २०१७ मध्ये भारत आणि चीनमध्ये झडलेला डोकलाम वाद आणि त्यानंतर २०१९ मध्ये लडाखमधील गलवान खोऱ्यात चीनी सैन्याची घुसखोरी आणि भारतीय सैनिकांवरील हिंसाचाराच्या निषेधार्थ चीनी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचा ट्रेंड देशभरात सुरू झाला. या संदर्भात गेल्या दोन वर्षांमध्ये देहरादूनमधील सणांच्या वेळी चीनमध्ये बनवलेल्या वस्तूंना बाजूला सारण्यात आले. व्यापारी आणि नागरिकांनी चीनी उत्पादनांपेक्षा भारतीय उत्पादनांना प्राधान्य दिले; पण या वेळी या शहरात चीनी उत्पादनांचा व्यवसाय फोफावताना दिसत आहे. पलटन बाजार, धामावाला, मोती बाजार, प्रेमनगर, राजपूर, जाखन, रायपूरसह अनेक ठिकाणी चीनी वस्तूंची बिनदिक्कत विक्री सुरू आहे. चीनी वस्तू स्वस्त असल्याने लोक मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत तर अधिक नफा मिळवण्यासाठी व्यापारीही मोठ्या प्रमाणात चीनी वस्तू मागवत आहेत.

भारतात बनवलेल्या सजावटीच्या वस्तू महाग असल्याने फारशा विकल्या जात नाहीत. अशा परिस्थितीत व्यापाऱ्यांना चीनी बनावटीच्या वस्तू विकणे भाग पडले आहे. अनेक लोक चीनी वस्तूंची मागणी करत असल्याचेही आढळले आहे. स्वस्त असण्याबरोबरच त्या आकर्षकही असतात. चीनी वस्तूंच्या बॉक्सवर बरेचदा 'माय इंडिया' असे लिहिलेले असते. सर्वसामान्यांची दिशाभूल करून या वस्तू विकल्या जात आहेत. बाजारात विकल्या जाणाऱ्या बहुतांश चीनी वस्तूंच्या बॉक्सवर 'मेरा भारत महान' किंवा 'मेक इन इंडिया'चा उद्घोष दिसतो, जेणेकरून ग्राहक ते भारतीय उत्पादन समजून खरेदी करतात. चीनमधून येणाऱ्या वस्तूंचे पॅकिंग भारतातच केले जाते. अशा परिस्थितीत या वस्तूसाठी भारतीय बॉक्सवर वरील संदेश छापण्यात आले आहेत. याशिवाय कागदापासून बनवलेले चीनी दिवेही बाजारात विकले जात आहेत. त्यांची किंमत १५० ते ५०० रुपयांदरम्यान आहे. चीनी रंगाच्या बल्बलाही मोठी मागणी आहे. तथापि, या वस्तूंची कोणतीही हमी नाही. अशा परिस्थितीमध्ये चीनी वस्तुंचा गनिमी काव्याला साजेसा शिरकाव आणि व्यापारीवर्गाची अधिकाधिक नफ्याची वृत्ती रोखयला हवी.

आजकाल

आदिवासींसाठी लढणारा बिरसा मुंडा आज नाही

१८७५ साली त्याचा जन्म झाला. कोल आदिवासी समाजात. सध्याच्या झारखंड राज्यातल्या छोटा नागपूर प्रदेशात.

तो मेंढ्या चारायचा, बासरी वाजवायचा. जडीबूटीच्या औषधांचं त्याचं ज्ञान अचंबित करणारं होतं.

ब्रिटीशांच्या हाती देशाचा कारभार जाईपर्यंत म्हणजे १९ व्या शतकापर्यंत जंगल-जमीन आदिवासींच्या सामूहिक मालकीची होती. १८६० फॉरेस्ट एक्ट नुसार देशातली सर्व जंगलं ब्रिटीश राज्यकर्त्यांनी बळकावली. सरपण गोळा करणं, तेंदू, आवळे, मोह, चारोळी, मध इत्यादी वेचण्याचा आदिवासींचा हक्क डावलला गेला. जंगलात गुरंढोरं चारणं हा गुन्हा ठरला. ब्रिटीशांनी अन्य भारतीयांना, व्यापाऱ्यांना कोल आदिवासींची जमीन विकून टाकली. ते जमीनदार बनले.

सुनील तांबे

जमीनदाराच्या पालखीसाठी कोलांनी पैसे द्यायचे, पालखीही उचलायची. जमीनदाराच्या घरात लग्न वा पूजा असेल तर त्याचा कर कोलांनी द्यायचा. त्याच्या घरात कुणी मेलं तर कोलांनी दंड भरायचा. कुणी जन्माला आलं तर कोलांनी पैसे द्यायचे. कोलांनी पळून जाईपर्यंत ही लूटमार चालू असायची. कोलांचं शोषण करणारे भारतीयच होते.

१८४५ पासून मिशनरी ख्रिश्चन धर्माचा प्रचार करू लागले. लाखो कोलांचं धर्मांतर करण्यात आलं. मिशनऱ्यांनी शाळा काढल्या. पण कोलांची जमीन ताब्यात घेतली. पारंपारिक देव-धर्मांपासून कोलांना तोडलं. आदिवासींनी त्यांच्या देवांची पूजा करणं हा गुन्हा ठरवला. बिरसाचाही बाप्तिस्मा झाला होता. पण त्याने धर्मगुरूशीच भांडण केलं. म्हणून त्याला शाळेतून हाकलण्यात आलं.

बिरसा एका हिंदू विणकराकडे राह्यला. तिथे तो वैदू म्हणून उपजिविका करू लागला. त्याची किर्ती सर्वदूर पसरली. आदिवासी त्याला ईश्वरी अवतार मानू लागले. १८९५ साली बिरसा प्रेषित झाला. जग नष्ट होणार आहे माझ्या भोवती जे मुंडा जमतील तेच वाचतील. बाकी सर्व परकीय लोक ब्रिटीश आणि त्यांचे भारतीय दलाल, जळून खाक होतील अशी भविष्यवाणी त्याने उच्चारली. ही सुरुवात होती राजकीय बंडाची.

टेकडीवर हजारो आदिवासी तीरकमठा, गलोली, कुऱ्हाडी घेऊन बिरसाच्या भोवती जमले. ब्रिटीशांनी बिरसाला अटक केली. दोन वर्षं कारावासात काढून बाहेर आल्यावर बिरसाने आदेश दिला केळ्याच्या झाडांचे पुतळे करून जाळा. हे पुतळे ब्रिटीश सरकारचे होते. १८९९ मध्ये बिरसाने आदिवासींना बंडाचं आवाहन केलं. तीरकमठे, गलोली, कुऱ्हाडी ह्या शस्त्रांनी आदिवासींनी ब्रिटीश, मिशनरी, भारतीय जमीनदार-सावकार यांच्यावर हल्ले केले. हाच उलगुलान प्रचंड मोठं रणकंदन. हे बंड चिरडण्यात आलं. बंदुकांच्या गोळ्यांनी. बिरसा जंगलात पळाला. पण मार्च १९०० मध्ये त्याला जेरबंद करण्यात आलं. ९ जून १९०० रोजी तुरुंगातच त्याचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी त्याने वयाची पंचविशीही पार केलेली नव्हती. आजही आपण आदिवासींच्या जमिनी हडप करतो आहोत. आपली खनिजं, आपलं पाणी त्यांच्या जमिनीत का, असे प्रश्न विचारतो आहोत. आपल्याला प्रत्युत्तर द्यायला, आपल्या विरोधात बंड करायला, आपल्याला खडसावायला आज बिरसा मुंडा नाही.

व्हायरल

पहिलटकरीण, सासू आणि आई

सकाळच्या पुणे-सांगली प्रायव्हेट बसच्या सगळ्यात पुढच्या २ + २ सीटसमोर पाय ठेवायला जास्त जागा असते. त्यातली एक खिडकीची सीट आज मिळाली होती. शेजारी एक पन्नाशीची, कुडता आणि लेगीन घातलेली बाई येऊन बसली. मधल्या पॅसेजच्या पलिकडच्या दोन्ही सीटवर अजून कुणी बसलं नव्हतं.

थोड्याच वेळात एक पन्नाशीच्या जवळपासची, प्लॅस्टिक जरीची, काठापदराची साडी नेसलेली बाई हातात चार महिन्याचं बाळ घेऊन काळजीपूर्वक बसमध्ये चढली. मागून सामान घेऊन एक तरुण, तिचा मुलगा आला. त्याच्यामागून एक जेमतेम विशीची जरीची, काठापदराची साडी नेसलेली, भाबड्या, अल्लड चेहऱ्याची मुलगी चढली. घट्ट एक वेणी, दागिने, जोडवी, हातापायाच्या नखांना छान गर्द गुलाबी नेलपेंट, सुंदर टिकली! तीच त्या बाळाची आई होती. दोघी जणी आमच्या पलीकडच्या सीटवर बसल्या .तिच्या मागून लेंगा घातलेले तिचे वडील मुलीची पिशवी ठेवायला बसमध्ये चढले. पिशवी ठेवून परत उतरले आणि त्या मुलीच्या खिडकीखाली उभे राहिले.

निरखून बघितलं तर त्या गृहस्थांच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहताना दिसलं. आत मुलीचे डोळे तुडुंब भरलेले. शेजारी बसलेल्या तिच्या सासूने मुलीच्या वडिलांना हात करत, काळजी करू नका, मी काळजी घेतो हिची, अश्या अस्सल सांगलीच्या भाषेत, पलिकडे ऐकू न जाणाऱ्या खिडकीतून आतूनच धीर दिला. ते सांगताना ती स्वत:पण डोळ्यात उभं राहिलेलं पाणी पदरानं पुसत होती. या सगळ्यात बसवाल्यांचा सीटा मोजण्याचा घोळ संपत नव्हता. मुलगी अचानक जागेवरून उठली, त्या बसच्या माणसाला दोन मिनिटं जरा थांबा असं सांगत भरभर खाली उतरली आणि जाऊन वडिलांच्या गळ्यात पडली. दोघांच्या डोळ्यातलं पाणी खळेना. बसमध्ये बसलेल्या सासूचेसुद्धा डोळे पाझरायला लागले. नवरा कसनुसा चेहरा करून उभा ! शेवटी बसच्या माणसानं नवऱ्याला तिला बसमध्ये बोलवायची विनंती केली. त्याने हाक मारल्यावर मोठ्या मुश्किलीनं डबडबल्या डोळ्यांनी मुलगी वर आली. हे सगळं बघणारी माझ्या शेजारची बाईसुद्धा डोळे पुसायला लागली. माझेपण डोळे ओलावले. सासूनं मायेनं सुनेचे डोळे पुसले. असंच असतं गं आपल्या बायकांचं, अश्या अर्थाचे काहीतरी उद्गार काढले आणि बराच वेळ दोघी डोळे पुसत दु:खी चेहऱ्यानं बसून राहिल्या. ४-५ महीने आईच्या घरी बाळंतपण झाल्यावर पहिलटकरीण बाळाला घेऊन सासरी चालली होती. अगदीच पोरसवदा मुलगी होती. वडिलांना जड गेलं असेल तिला सोडताना. थोड्या वेळानं मुलगी शांत झाली. नवऱ्याकडून मोबाईल घेतला, आईला फोन करून पप्पा घरी पोचले का असं विचारून घेतलं. बाळ आजीच्या मांडीवर झोपलं होतं. माझ्या शेजारी बसलेल्या बाईंनी मला सांगितलं की त्यापण आपल्या मुलीच्या घरून, मुलीला आणि दोन जुळ्या नातीना सोडून येत होत्या, त्यामुळं त्या वडिलांचं दु:ख बघून त्यांना मुलगी आणि नाती आठवून रडू आलं.

थोड्या वेळानं बाळ उठलं. थोडी किरकिर केली. त्याचं पोट भरलं मग ते इकडं तिकडं मजेत बघायला लागलं. मुलीनं बाळ दाखवायला आपल्या आईला व्हिडिओ कॉल केला. आई कॉलवर आली आणि तिला जे काही रडू फुटलं ते आवरेच ना ! चार सीट पलिकडे बसलेल्या मलासुद्धा तिनं मांडलेला गहिवर दिसत होता, ऐकू येत होता. बराच वेळ तिला स्वत:लाच शांतच करता येईना. तिचे हुंदकेच संपेनात. इकडे सासूच्या गंगा यमुना सुरू.. शेवटी इतका वेळ लहान वाटणारी, कसानुसा चेहरा करून बसलेली मुलगी अचानक मोठी होऊन आईची सम जूत घालायला लागली. असं रडून कसं चालेल? आम्ही येत राहू की तिकडं. घर रिकामं वाटत असेल ना? होणार असं. सवय होईल हळूहळू बघ. सासू म्हणाली, तुम्ही या आता चार दिवसांनी नातीला भेटायला इकडं. नवरा तर उगीचच अपराधी चेहरा करून बसला होता. तो म्हणायला लागला, त्यांना सांग आई, आज संध्याकाळचीच गाडी पकडून इकडं या म्हणावं. असंच बोलता बोलता तिघी बायका शांत झाल्या, बाळाचं कौतुक सुरू झालं , गप्पा, हकीकती एकमेकींना सांगणं सुरू झालं. तीन चार तासाच्या प्रवासात बाबाच्या लाडक्या मुलीची आईची आई झालेली बघितली. सुनेच्या, तिच्या आईवडिलांच्या वेदनेनं डोळ्यात पाणी आलेली सासू बघितली, आणि कुठल्या कोण बिनओळखीच्या बापाची वेदना समजून डोळे भरून येणारी (शेजारी बसलेली) अनोळखी बाईसुद्धा !

- रंजना बाजी..

लोकसंसद

हुल्लडबाजी

नाशिकच्या मालेगावमध्ये पुन्हा एकदा सिनेमागृहात फटाके व आतषबाजी करण्याचा धक्कादायक प्रकार घडल्याची बातमी वाचनात आली आहे राज्यासह देशभरात मोठ्या उत्साहात दिवाळीचा सण साजरा करण्यात येत आहे. हवेची गुणवत्ता ढासळल्याने न्यायालयाने फटाके फोडण्याची वेळ ठरवून दिली आहे. मात्र अनेक ठिकाणी याचं उल्लंघन होताना दिसत आहे. दुसरीकडे काही हुल्लडबाज तरुणांनी चक्क थिएटरमध्येच फटाके फोडल्याचे समोर आले आहे. सलमान खान याचा टायगर ३ चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या त्याच्या चाहत्यांनी कळस गाठत थेट थिएटरच्या आतमध्ये मोठ्या प्रमाणात फटाके फोडले. या सगळ्या प्रकारामुळे थिएटरमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं होतं. मालेगावच्या मोहन थिएटरमध्ये सलमान खानच्या टायगर ३ चित्रपटाच्या शेवटच्या शो दरम्यान हा सगळा प्रकार घडला. पडद्यावर अभिनेत्याची एन्ट्री होताच हुल्लडबाज चाहत्यांनी चक्क चित्रपटगृहातच जोरदार मोठे मोठे फाटके फोडून आतशबाजी सुरु केली. बराच वेळ हा प्रकार सुरु होता. या प्रकारामुळे इतर प्रेक्षकांचा जीव धोक्यात आला होता. या प्रकारामुळे आग लागून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. तसेच मोठ्या प्रमाणात चेंगराचेंगरी देखील होण्याची शक्यता होती. दरम्यान मालेगावमध्ये चित्रपटगृहात फटाके फोडण्याचे प्रकार सातत्याने होत आहे.त्यामुळे या घटनेमागे कोणाचा हात आहे का? असा देखील प्रश्न उपस्थित होतो आहे त्यामुळे याची सुद्धा चौकशी झाली पाहिजे आणि या घटनेमध्ये जे कोणी दोषी आढळतील अशा हुल्लडबाज, टवाळखोर चाहत्यांना आळा घालणे गरजेचे आहे !

- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

प्रेरणा

राजस सुकुमार

राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ।।१।।
कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ।।ध्रु.।।
मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें ।
सुखाचें ओतिलें सकळही ।।२।।
कासे सोनसळा पांघरे पाटोळा ।
घननीळ सांवळा बाईयांनो ।।३।।
सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा ।
तुका म्हणे जीवा धीर नाहीं ।।४।।

अर्थ : राजस, सुकुमार असा हा विठ्ठल म्हणजे जणू मदनाचा पुतळा आहे सूर्य-चंद्राच्या प्रभा त्याच्या तेज्यात लपल्या आहे. त्याच्या कपाळी कस्तूरीचा मळवट भरला असून अंगावर चंदनाची ऊटी लावलेली आहे गळ्यात वैजयंती माळा रूळत आहे. मस्तकावर मुकुट व कानात कुंडले असलेले सुंदर रूप म्हणजे जणू सर्व सुखाचे आगर आहे. त्याने कमरेला जरीकाठी पितांबर नेसले आहे व भरजरी शेला पांघरला आहे. बायांनो असा हा विठुराया सावळ्या रंगाचा आहे. तुकाराम महाराज म्हणतात तुम्ही सर्व बयांनी एका बाजुला व्हा माझ्या आड येऊ नका, श्रीमुख पहिल्याखेरीज माझ्या मनाला समाधान लागत नाही.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ नोव्हेंबर

१) श्रीम. शुभांगी किल्लेकर
अलिबाग, १६-११-१९४९

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

दिवाळीत पर्यटकांची मुरुडला पसंती

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

विविध विभागातील अनेक पर्यटकांनी जंजिरा किल्ला पाहण्यासाठी अधिक पंसती दिली आहे. राजपुरी व खोराबंदर येथे गाडया पार्क करुन जेट्टीवरुन शिडयांच्या होड्याव्दारे किल्ल्याकडे पर्यटकांना नेले जाते.

जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची विशेष गर्दी दिसत होती. एकांतपणा, निवांतपणा आणि पांढऱ्या शुभ्र वाळूवर फेसाळत येणारा सागरी लाटाचा किनारा मन नक्कीच मोहवते.

मुरुड शहराला अडीच किलोमिटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा पर्यटकांचा खुणावत असतो.

या अंतरात कुठेही खडकाळ भाग लागत नाही त्यामुळे पर्यटकांना घोडागाडीतुन व मोटारबाईकवरून सहकुटुंब समुद्रकिनारी फिरण्याची अस्सल मजा लुटता येते. समुद्रकिनारी दिवाळीची सुट्टी साजरी करण्यासाठी असंख्य पर्यटक मुंबई, पुणे, ठाणे तर शहरातुन आणि जिल्हाच्या विविध भागातुन कुटुंबासह मोठया संख्येने सम ुद्रकिनारी दाखल झाले आहेत.

गुलाबी थंडी अवतरली

गेल्या तीन दिवसांपासून तालुक्यात थंडीचा कडाका वाढता असून गुलाबी थंडीचा मोसम अनुभवायला मिळत आहे. काशीद, मुरुड, नांदगाव, सर्वे, बारशिव समुद्रकिनारी पर्यटकांचे घोळके पहायला मिळत आहे.विशेषतः काशीद, मुरुड बीचवर पर्यटकांची उपस्थिती फार मोठी दिसून येत आहे. आलेले पर्यटक समुद्रात पोहण्याचा मनसोक्त लुटताना दिसत आहेत.

काशीद-बीच, दत्तमंदिर, गांरबी, जंजिरा किल्ला, ईदगाह हा परिसर आल्हाददायक, शांत, रमणीय आहे.

मुरूड समुद्रकिनारी वाळूच्या किनाऱ्यावर पर्यटकांची वर्दळ दिसून येत आहे. मुरूड समुद्रकिनारी वाळूवरील पार्किंग फुल्ल झाले आहे. जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठीचा पर्यटकांचा आणि शैक्षणिक सहलींचा ओघ कायम आहे.

हॉटेलमधील चविष्ट मासे खाण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केल्याचे सुद्धा दिसून आले. पर्यटकांची संख्या वाढल्याने प्रत्येक घटकाला स्वयंरोजगार प्राप्त झाला होता.

प्रत्येक तासाला वाहनांची वाढती संख्या व वाहतुकीसाठी रस्ता मोकळा करताना मोठी समस्या उद्भवत होती.

पर्यटकांमुळे मुरुडच्या मुख्य बाजारपेठेत सुद्धा गर्दी दिसून आली विविध वस्तू खरेदीसाठी पर्यटक बाजारपेठेतसुद्धा आले होते. समुद्रस्नान बोटिंग उंट सफारी, बनाना रायडिंग आदींचा आनंद लुटताना पर्यटक दिसत होते.

जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांच्या रांगा

शेतकऱ्यांची बांधणीसाठी लगबग

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भातकापणीनंतर आता शेतकऱ्यांची बांधणीसाठी लगबग सुरू झाली आहे. शेतकरी शेतामध्ये बांधणीच्या कामात व्यस्त झाला आहे. जिल्ह्यात ७५ टक्के पेक्षा अधिक कापणीची कामे झाली आहेत. मात्र अवकाळी पावसाच्या भीतीने शेतकऱ्यांनी कापणीसह बांधणीची कामे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू केली आहेत. हातातोंडाशी आलेला घास पाण्यात जाऊ नये यासाठी कापणीची आणि त्यानंतर बांधणी करून उडवी रचण्याची कामे वेगात सुरू झाली आहेत.

अवकाळी पावसात रचलेली भाताची रोपे भिजून भाताचे नुकसान होऊ नये यासाठी शेतामध्ये जमिनीपासून उडवी उंच रचली जात आहे पावसाचे पाणी उडवीच्या आत शिरून भात खराब होऊ नये म्हणून त्यावर प्लास्टीक आवरण देखील ठेवण्याचे काम केले जात आहे. आठ दिवसात ही कामे पूर्ण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

अनेकांच्या हाताला काम

भात कापणी बरोबरच बांधणी व झोडणीची कामे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू झाली आहेत. त्यामुळे गावांतील अनेक बेरोजगारांच्या हाताला काम मिळू लागले आहे. २५० रुपयापासून ३०० रुपये मजूर गावातल्या गावात मिळत असल्याने कामगारांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे .

सारडे विकास मंचातर्फे मिठाईचे वाटप

। उरण । वार्ताहर ।

दिवाळीचा सण आनंद मांगल्य चैतन्य निर्माण करणारा सण आहे. हा आनंद दुर्गम भागातील नागरिकांना मिळावा यासाठी अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांतर्फे पुढाकार घेतात. विविध आदिवासी पाड्यांवर फराळ वाटपासोबतच जीवनावश्यक वस्तुंचेही वाटप देखील करतात. सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत चिरनेर आदिवासी वाडीवर राहणाऱ्या आदिवासी बांधवांची दिवाळी सारडे विकास मंचाच्या माध्यमातून गोड करण्यात आली आहे.

उरण परिसरातील सारडे विकास मंच या संस्थेतर्फ दिवाळी आदिवासी पाड्यांवर साजरा करण्यात आली. चिरनेर आदिवासी पाड्यावरील गरीब व गरजू कुटुंबांना, दिवाळीची मिठाईसह विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून या आदिवासी मुलांची दिवाळी गोड करण्यात आली.

समाजाप्रती असणारी सामाजिक बांधिलकी जपत सारडे विकास मंचतर्फे दरवर्षी आदिवासी पाड्यावर जाऊन विविध वस्तूंचे व दिवाळीच्या फराळाचे वाटप केले जाते. यंदाही संस्थेतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, रूपाली म्हात्रे, अक्षय कोळी, अभिषेक ठाकुर, प्रथमेश घरत, सुधीर मुंबईकर, मोरा हायस्कूल शिक्षक, सदाबहार दोस्ती गृप, क.भा.पा.वि. ९३/९४ बॅच पिरकोन, तुकाराम गावंड, विजय गावंड, संतोष जोशी, कैलास पाटील, कामेश्वर म्हात्रे, आवरे, हरिश्चंद्र म्हात्रे, अरूण म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, सचिन पाटील, विनायक गावंड, भावार्थ गावंड, विराट पाटील, रणिता ठाकुर, सई म्हात्रे, वेदिका म्हात्रे, हर्ष गावंड, विभा म्हात्रे, दानिश म्हात्रे, राजेश पासी, रिया म्हात्रे उपस्थित होते.

तीस टक्के कुटूंबधारकांना आनंदाचा शिधा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

गतवर्षी प्रमाणे यंदादेखील गरिबांची दिवाळी गोड जावी यासाठी आनंदाचा शिधा शासनाकडून देण्यात आला आहे. जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून शिधावाटप करण्यात आले आहे. आतापर्यंत ३० टक्के गरीबांपर्यंत दुकानांमधून शिधा देण्यात आला आहे. एक लाख ४२ हजार कुटूंब धारकांना ते वाटप झाल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे .

अंत्योदय व प्राधान्य कुटूंब योजनेचा लाभ घेणाऱ्या कुटुंबधारकांना दिवाळी आनंदात साजरी करता यावी यासाठी पामतेल एक लिटर, साखर, चणाडाळ, रवा असे प्रत्येकी एक किलो जिनस शंभर रुपयांत दिले जात होते. यंदाही आनंदाचा शिधा कुटुंबधारकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. यावर्षी मैदा व पोहे या आणखी दोन जिनसची वाढ केली आहे.

जिल्ह्यात चार लाख तीन हजार ८१ कुटुंबधारक आहेत . जिल्हयातील रास्त दुकानात शिधा पोहचला असून दिवाळीपूर्वी तो वाटण्यास सुरुवात केली आहे . एक लाख सात हजार जणांना ऑनलाईन तर ३५ हजार ऑफलाईन पद्धतीने वाटप केले आहे. दोन लाख आठ हजार ८८१ जणांना लवकरच हा शिधा पोहचेल असे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात आले.

शिहू येथे दीपोत्सव उत्साहात साजरा

। शिहू । वार्ताहर ।

येथील श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात लक्ष्मीपूजनाचे औचित्य साधून दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दीपोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून, १५०० दिव्यांनी व आकर्षक रांगोळ्यांनी मंदिर परिसर सजवण्यात आला होता. या उपक्रमात तरुणांसह मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग घेतला होता. हिंदू सणामध्ये दिवाळी सणाला अधिक महत्व असून अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतीक मानले जाते. त्याच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधःकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव साजरा केला जातो.

पुराणात असे सांगितले जाते की लंका जिंकून भगवान राम अयोध्येला परत आले तो दिवस कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील अमावस्या तिथी होती, त्या वेळी अयोध्येतील सर्व जनतेने दीप प्रज्वलन करून त्यांचे स्वागत केले होते.

परस्पर पतसंस्थेच्या अध्यक्षपदी विजय पैर

। कोर्लई । वार्ताहर ।

भारत देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी स्थापन झालेल्या व आजतागायत उत्तम कामगिरी करणाऱ्या मुरुड शहरातील परस्पर सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी विजय पैर यांची निवड झाली.

अध्यक्षपदी विराजमान होणे हे माझे भाग्य असून सर्वांच्या सहकार्याने तिला प्रगतीपथावर नेण्यासाठी मी प्रयत्न करेन असे प्रतिपादन निवडीनंतर त्यांनी केले.

तसेच पतसंस्था भविष्यात तिच्या वाढीसाठी योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न देखील करणार असल्याचे सूतोवाचही त्यांनी यावेळी सांगितले.

संस्थेच्या उपाध्यक्षपदी राजू पोतनीस यांची यावेळी निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून दीपक राजपूरकर, विनायक भगत,विजय भोय, प्रभाकर मसाल ,विजय भगत, अपर्णा सुभेदार,आदिती भोसले, विनय मथुरे यांचीही निवड करण्यात आली.

विजय पैर यांची अध्यक्षपदी निवड होताच राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरुड तालुकाध्यक्ष फैरोजशेठ घलटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संजय गुंजाळ, अविनाश उर्फ बाबा दांडेकर, संदेश दांडेकर, हसमुख जैन, नरेंद्र हेदुलकर, योगेंद्र गोयजी, दिनेश बापलेकर, राकेश मसाल, तसेच पतसंस्थेचे अनेक आजी- माजी सभासद, पतसंस्थेचे हितचिंतक, राजकीय, सामाजिक संस्थेतील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवाळीनिमित्त महिलांना साड्या वाटप

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी नजीकच्या दुर्गम सारसई भागातील आदिवासी महिलांना मुंबा देवी ट्रस्ट मुबंई आणि द्वारकाधीश चॅरिटीज मुबंई यांच्यावतीने दिवाळीनिमित्त दोनशे महिलांना साड्या वाटप करून दिवाळी साजरी करण्यात आली.

सारसई हा दुर्गम भाग असून येथे आदिवासी आणि ठाकूर समाजाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे शिंगाडे यांनी या भागातील आदिवासी जनतेला न्याय देण्यासाठी सतत प्रयत्न करत असतात. त्याच्याच प्रयत्नाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी संस्थेचे सदस्य आनंद देशमुख, गोगटे काका, मीना पवार, दिशा केणी, मनीषा वाघे, कृष्णा वाघे, दामू वाघे, कानू वाघे आदींसह अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फटाक्यांमुळे उरणची हवा दूषित

। उरण । वार्ताहर ।

उरणकरांनी दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी रविवारी जोरदार दिवाळी साजरी केली. फटाके वाजविल्यानंतर निघालेल्या धुरामुळे उरणची हवा दूषित झाली आहे. आधीच उरणमध्ये प्रदूषण आहे. त्यात फटाक्यांचा धुरामुळे प्रदूषणाचा मीटर २०० च्या पुढे गेला आहे.

या धुरामुळे पुन्हा उरणची हवा मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाली आहे. अवकळी पावसामुळे हवेची गुणवत्ता सुधारली होती. मात्र, आता उरणच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांनी पुन्हा खालावला आहे.

हवेची गुणवत्ता पातळी ही २०० मीटरच्या वर पोहोचली आहे. राज्यात प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे.

उरणमध्ये तर श्वास घेणेदेखील कठीण झाले आहे. हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात निर्बंध लागू करण्यात आले आहे. अवकाळी पावसामुळे उरणची हवा सुधारली होती. मात्र, रविवारी फटक्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले असून उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांक हा मीटर २०० च्या वर जाऊन पोहचला आहे. रविवारी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. काही नागरिकांनी तर संध्याकाळपासून फटाके फोडने सुरू केले होते.

उरणच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत चालल्याने सर्दी, खोकला बरोबर इतर साथीच्या आजारांनीही डोके वर काढले आहे. याकडे प्रदूषण मंडळाने वेळीच लक्ष दिले नाहीतर परिस्थिती गंभीर बनण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाने देखील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी उपाय योजना करणे गरजेचे आहे असे नागरिकांचे म्हणणे आहे.

आदिवासी बांधवांना फराळ वाटप

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठणे ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या मिरानगर आदिवासीवाडी येथे शिहू येथील शांताबाई नारायण शेळके ट्रस्टच्या वतीने दिवाळीनिमित्त आदिवासी कुटुंबांना फराळ आणि साड्या वाटप करण्याचा कार्यक्रम मंगळवारी (दि.१४) किशोर जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला. त्यावेळी उपस्थित आदिवासी बांधवांना किशोर जैन यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास नागोठणे ग्राम पंचायतीच्या पहिल्या थेट महिला सरपंच सुप्रिया संजय महाडिक, नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पोमन, शांताबाई नारायण शेळके ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहीदास शेळके, धनंजय जगताप, मजीद लंबाते, ॲड. प्रकाश कांबळे, मंगीताई कातकरी, विनोद पाटील, बापू रावकर, दिगंबर खराडे यांच्यासह मिरानगर आदिवासी वाडीतील ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

ज्येष्ठांसाठी देवदर्शन वारीचे आयोजन

गोवे-कोलाड : रोहा तालुक्यातील स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ कोलाड यांच्यावतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी ज्येष्ठ नागरिक संघटनेकडून एकदिवसीय देवदर्शन वारीचे आयोजन केले आहे. प्रति पंढरपूर, प्रति शिर्डी, प्रति बाळाजी, गगनगिरी महाराज मठ, सातारकर महाराज मठ व इतर देवस्थान ठिकाणी कमप्राप्त दर्शनासाठी वारीचे आयोजन करण्यात आले आहे. सहल दि.२९ नोव्हेंबर रोजी कोलाड सरकारी दवाखाना येथून निघणार आहे. यासाठी कोलाड विभागातील ज्येष्ठ नागरिकांनी यासाठी आपल्या नावाची नोंद लवकरात लवकर करावी, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

कर्जतमध्ये रंगली दिवाळी संध्या

। कर्जत । वार्ताहर ।

बाळासाहेबांची शिवसेना कर्जत शहराच्या वतीने आयोजित केलेल्या कलावैभव आणि स्वरवैभव निर्मित स्वर मैफल दिवाळी संध्या संगीत मैफलीमध्ये गायकांनी सादर केलेल्या जुन्या-नव्या गीतांमुळे कर्जतकर मंत्रमुग्ध झाले. यावेळी साथ संगत देणाऱ्या कलाकारांनी उपस्थितांची वाहवा मिळवली

कर्जतमधील श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात दिवाळी संध्या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. आ. महेंद्र थोरवे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून मैफलीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी माजी उपसभापती मनोहर थोरवे, संकेत भासे, अरुण म्हात्रे, अभिषेक सुर्वे, प्रसाद पाटील, अभिनेता राहुल वैद्य आदी उपस्थित होते.

सूर निरागस हो या वैभव थोरवे यांनी गायलेल्या गीताने संगीत मैफलीचा शुभारंभ करण्यात आला.

त्यानंतर गगन सदन, पांडुरंग कांती, विठ्ठल आवडी, कानडा राजा, मीराधिका, बाजे मुरलिया बाजे, मन मंदिरा, देवा घरचे ज्ञात कुणाला, सुरत पिया की, झिणी झिणी, कधी तू रिमझिम, नवीन आज चंद्रमा, येऊ कशी प्रिया, मी रात टाकली, राजा ललकारी, आदी एकापेक्षा एक सरस गीते सागर म्हात्रे, फाल्गुनी जोशी, दीपाली देसाई, अबोली गिर्हे, अजय जोशी यांनी सादर केली.

त्यांना श्रीकात राईलकर, प्रकाश गायकवाड, ओंकार देवसकर, मंदार तांडेल, वैभव थोरवे व अजय जोशी, तालवाद्य केतन गडकरी यांनी साथ दिली. अरुण म्हात्रे यांनी यांनी खास शैलीत निवेदन करताना कविता सादर करून मैफलीची रंगत वाढविली.

याप्रसंगी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, गौतम वैद्य, सुरेश सावंत, सुचेता वांजळे, शैला विशे, प्रकाश पटवर्धन, प्रभाकर करंजकर, सतीश श्रीखंडे, सुनील सोनी, दिनेश कडू, अशोक मोरे, केतन मोधळे, बाली शितोळे, विठ्ठल कडू, ज्ञानेश्वर कडू, विवेक जोशी, साहिल नातू, वैभव सुरावकर, प्रसाद थोरवे, विकास चित्ते, सुगंधा जोशी, नंदकुमार टिळक आदी उपस्थित होते.

संगीत स्वर मैफलीनी श्रोते मंत्रमुग्ध

आदिवासी वाड्यांवर फराळ वाटप

। कर्जत । वार्ताहर ।

राजाभाऊ कोठारी संचालित कोठारी क्लासेसच्या टी. वाय. बी. कॉम. २०१७ च्या बॅचच्यावतीने दरवर्षी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आदिवासी वाड्यात दिवाळी फराळाचे वाटप करण्यात येते.

यंदा या फराळ वाटपाचे हे सातवे वर्ष आहे तालुक्यातील साळोख व नांगुर्ले या दोन आदिवासी वाडीत २०० कुटुंबांना दिवाळी फराळाचे व उटणे पाकिटाचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी राजाभाऊ कोठारी, डॉ. प्रशांत सदावर्ते, संजीव ठाकरे, अशोक शेडगे, रूपेश ठाकरे, वैभव जगताप, शुभम कदम, मितेश डागा, अंकित सोनावणे, संकेत हार्णे, सौरभ देशमुख, मिलिंद कनोजिया, अभिजित जंगम, राणी लोवंशी, पुष्पा वर्मा, जसोदा देवडा, तन्वी शिंदे, आण्णा पवार आदी उपस्थित होते.

दिवाळी सुट्ट्यांमुळे पालीमध्ये पर्यटक

बेशिस्त वाहन पार्किंगमुळे वाहतुक कोंडी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।
दिवाळी सुट्ट्यांमुळे अष्टविनायकापैकी एक असलेल्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीमध्ये भाविकांची गर्दी होत आहे. दक्षिण रायगड, कोकणात येणारे पर्यटकही बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येत असल्याने पाली शहरात वाहतूक कोंडी होत आहे. अरुंद रस्ते, बेशिस्त वाहन पार्किंगमुळे दिवसेंदिवस कोंडी वाढत असल्याने स्थानिक नागरिकांना मात्र त्रास सहन करावा लागतो.

पालीमध्ये येणारे भाविक, पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल्स, पूजा साहित्य विक्री, तसेच अन्य व्यवसाय तेजीत आहेत. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले असून दुकाने व हॉटेल्स गजबजली आहेत. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

अनेक भाविक स्वतःची वाहने घेऊन येतात तर काही खासगी बस करून येतात.

त्यामुळे पालीतील रस्त्यावर कोंडी होत आहे. बल्लाळेश्वर मंदिर, ग.बा. वडेर विद्यालय, जुना एसटी थांबा, गांधी चौक, मारुती मंदिर, बाजारपेठ, हाटाळेश्वर चौक आदी ठिकाणी वाहतूक कोंडी होते.

> पालीमधील रस्त्यांचे डांबरीकरण केले आहे. काही ठिकाणची अनधिकृत बांधकामेही हटवली आहे . महाकाली मंदिर व हनुमान मंदिर येथील रस्ता अधिक रुंद केला आहे. बाह्यवळण मार्ग झाल्यास पाली शहरातील वाहतूक सुरळीत होईल. शिवाय भाविकांची वाहने व अवजड वाहतूक शहराबाहेरून होईल. यासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत, त्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे.
> - प्रणाली सूरज शेळके, नगराध्यक्ष, पाली

> पालीतील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस कठीण होत आहे. रस्त्यालगत अतिक्रमण, अवैध पार्किंगमुळे ही समस्या अधिक जटील होत आहे. - कपिल पाटील, पाली

वाहनांची रेलचेल

मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था झाली आहे, तेथे वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यामुळे मुंबईवरून कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळेमार्गे माणगाववरून किंवा वाकणवरून पुढे जातात, तर कोकणाकडून येणारी वाहने माणगाववरून विळेमार्गे पाली, खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीमध्ये वाहनांची रेलचेल वाढत असून कोंडीत भर पडते.

चिमुरड्यांची भाऊबीज.....

आपल्या भावाला ओवाळणी करून, फराळ भरवत भेटवस्तू देऊन या चिमुरड्यांनी भाऊबीज साजरी केली. (छायाः श्रेया फोटो)

आदिवासी बांधवांची दिवाळी झाली गोड

। पाली/बेणसे । वार्ताहर ।
गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांच्यावतीने सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर खुर्द आदिवासीवाडी व रेळाचीवाडी येथील ६० कुटुंबांना दिवाळीनिमित्त साहित्य भेट देऊन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली.

या साहित्यामध्ये ६० ब्लँकेट, ३० नऊवारी साड्या, ४० सहावारी साड्या, प्रत्येकी टॉवेल, मिठाईचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, चित्रकला वह्या, कलर बॉक्स, पाटी-पेन्सिल अशा प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आले. साहित्य वाटप झाल्यानंतर सर्व आदिवासी बांधवांनी गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांचे आभार मानले.

या कार्यक्रमानिमित्त गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांचे संस्थापक गोरख पाटील, सचिन पाटील, आयुब शेख, मयूर सारंग, मयूर पाटील, शंकर विश्वकर्मा, इरफान भाई आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शिक्षक उल्हास केदारी यांनी प्रयत्न केले, तसेच शिक्षक पांडुरंग पारधी यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक दंत व आभार भगवान साजेकर यांनी मानले.

उंबरमाळ आदिवासीवाडी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

। पेण । प्रतिनिधी ।
तालुक्यातील पाच आदिवासी वाड्यांपैकी उंबरमाळ आदिवासी वाडी रस्त्याच्या खडीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काम अखेर सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना आता दळणवळणासाठी चांगले रस्ते मिळणार आहेत.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही येथील आदिवासीवाडीतील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता आला नव्हता. अशा वाड्यांवर सोयी-सुविधांची चांगलीच वानवा होती. वाड्यांवर रस्ते नसल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. वाड्यांवर रस्ते पोहोचले पाहिजेत, यासाठी सामाजिक संस्थांनी आंदोलने, मोर्चे काढून प्रशासनासह सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था आणि महाराष्ट्र स्टुडंट युनियन या संघटनांनी आदिवासी बांधवांसोबत पुकारलेल्या लढ्याला आता यश आले आहे. सोमवारी येथील उंबरमाळ आदिवासीवाडीच्या खडीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काम सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून सुरू करण्यात आले.

ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या प्रयत्नांना यश

पेण शहराला लागून असलेल्या उंबरमाळ खाऊसावाडी, काजूचीवाडी, तांबडी, केळीची वाडी या आदिवासीवाड्यांना हक्काची ग्रामपंचायत तर सोडाच; परंतु रस्ता, पाण्यासारख्या मूलभूत सुविधाही उपलब्ध नाहीत. या सर्व समस्यांना संतोष ठाकूर यांनी पाचही आदिवासी वाड्यांतील आदिवासी बांधवांना सोबत घेऊन मोर्चे, आंदोलने काढून पाठपुरावा सुरुच ठेवला होता. खवसावाडी हा रस्ताही सहा महिन्यांपूर्वी मंजूर झालेला असताना त्याचा कार्यारंभ आदेश देऊनही ठेकेदाराने कामाला सुरूवात केलेली नाही. त्यामुळे येत्या पंधरा दिवसांत या रस्त्याच्या कामाला सुरूवात न केल्यास आंदोलनात्मक पवित्रा घ्यावा लागेल. कामाला सुरुवात झाल्याने उंबरमाळमधील आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. याप्रसंगी किशोर पाटील, सुनीता पाटील, सुनील वाघमारे, महेश पाटील, यशवंत वाघमारे, शिमग्या हिलम, रेणुका हिलम, रुपाली वाघमारे यांच्यासह आदिवासी बांधव उपस्थित होते.

गड किल्ल्यातून जपला जातोय इतिहास

। उरण । वार्ताहर ।
छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्याच्या हेतूने उरण परिसरातील ग्रामीण व शहरी भागात बच्चे कंपनीने किल्ले बनवून शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्याचा प्रयत्न केला आहे. सोशल मीडियाच्या युगात वावरणारी बच्चे कंपनी आजही किल्ले बनविण्याच्या विधायक उपक्रमात स्वतःला गुंतवताना दिसत आहेत.



दिवाळी सुरू होण्यापूर्वीच बच्चे कंपनीला वेध लागतात ते किल्ले बनविण्याच्या कामाचे. अशातच मुलांना प्रोत्साहन देण्याकरता किल्ले बांधण्याच्या स्पर्धा देखील उरण तालुक्यातील काही सामाजिक मंडळामार्फत घेण्यात येत आहेत. पालकही बच्चे कंपनीला प्रोत्साहन देताना दिसत आहेत.

सध्या तयार किल्ले सर्वत्र पाहायला मिळत असताना ग्रामीण भागातील मुले डोंगरातील व शेतातील लाल काळ्या मातीपासून घराच्या अंगणात किल्ले तयार करताना पहावयास मिळत आहेत. किल्ला तयार झाल्यावर त्यावर शिवाजी महाराजांची मूर्ती विराजमान केली जाते. त्याचबरोबर पहारेकरी मावळे किल्ल्यावर ठेवले जातात. किल्ला मावळे, सैनिक व रंग यांनी सजवला जातो. त्यावर मोहरी टाकून उगवलेली हिरवळ दाखविली जाते. तसेच पाण्याचे कारंजे व रात्री किल्ल्यावर केलेल्या रोषणाईने किल्ले उजळून निघतात.

दिवाळीमध्ये बच्चे कंपनी आणि युवक युवती देखील निरनिराळे किल्ले, गड, सामाजिक देखावे साकारून कला आणि पारंपारिक संस्कृती जपताना दिसून येत आहेत. रायगड किल्ला, प्रतापगड, सिंधुदुर्गगड कर्नाळा अशा प्रसिद्ध किल्ल्यांची प्रतिकृती चिरनेर परिसरातील गावागावात तयार करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

शिवप्रेरणा प्रतिष्ठानतर्फे किल्ले, रांगोळी स्पर्धा

। अलिबाग । प्रतिनिधी ।
दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शिवप्रेरणा प्रतिष्ठान वेश्वी यांच्यामार्फत किल्ले व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मुलांना आपल्या परंपरेची व संस्कृतीची जाण असावी या अनुषंगाने शिवप्रेरणा प्रतिष्ठान मार्फत पाच वर्षांपूर्वी या स्पर्धेची सुरुवात केली होती. ही परंपरा कायम ठेवत यावर्षी ही स्पर्धा घेतली.

साधारण २५ किल्ले व २४ रांगोळी स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यात किल्ले लहान गटात प्रथम क्रमांक दूर्वा समीर शेळके, गट द्वितीय क्रमांक रुद्र प्रशांत गोळे व तृतीय क्रमांक मयंक मगर तसेच मोठा गट प्रथम क्रमांक दीप किरण काकडे, द्वितीय क्रमांक ऋषिकेश माळवी व तृतीय क्रमांक श्रेयस ठाकूर यांनी मिळवला.

रांगोळीत लहान गट प्रथम क्रमांक रिया पाटील, द्वितीय क्रमांक वैभवी सुमित शेळके व तृतीय क्रमांक धनु गोतावडे तसेच मोठा गट प्रथम क्रमांक उत्कर्षा रमेश शेळके, द्वितीय क्रमांक स्नेहल किरण कदम तृतीय क्रमांक कोमल तडाके यांनी पटकावला. स्पर्धेचे परीक्षण रोहित पवार, विशाल आढाव, श्रीकांत म्हात्रे व अंकित मिंढे यांनी केले.

चौकमध्ये विद्यार्थ्यांसाठी किल्ले बनवण्याची स्पर्धा

। पाताळगंगा । वार्ताहर ।
नेताजी पालकर मंडळ चौकच्या माध्यमातून या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी किल्ले स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गेली ३८ वर्ष हे मंडळ उपक्रम राबवित आहेत. चौक, जांभिवली, धारणी, हातनोली, वावर्ले, नानीवली या गावांमध्ये किल्ले स्पर्धेत ६० मुलांनी सहभाग घेतला होता. या किल्यामध्ये भुयारी मार्ग, विहिरी, शेती, तोफखाना, धान्य साठविण्याची खोली आदी यामध्ये दाखविण्यात आले होते.

या स्पर्धेचे परीक्षणे रश्मी शिरसकर, अनिता मगदूम, रुपाली पाटील, प्रदीप कुलकर्णी,राज इंदवटकर, ओम सुर्वे, संजय कुमठेकर यांनी केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी यशवंत सकपाळ, भूषण पिंगळे, अनिल खंडागळे, राजेंद्र दुर्गे, जितेंद्र ठाकूर, कृष्णा गावडे, अशोक मोरे, सुदेश महागावकर, मंदार ठकेकर यांनी मेहनत घेतली.

माधवीताई जोशी प्रतिष्ठानतर्फे गरिबांना सहकार्य

। रसायनी । वार्ताहर ।
माधवीताई जोशी युवा प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्षा, समाजसेविका माधवीताई जोशी आणि उद्योजक नरेश जोशी ही अगदी सहृदयी आणि भावनिक व्यक्तिमत्त्व. नेहमीच समाजकल्याणात अग्रेसर भूमिका बजावताना दिसून येत आहेत.

माधवीताई जोशी अणि नरेश जोशी यांनी कुंभेवाडी आणि आंबिवली वाडी येथे जाऊन प्रत्येक महिलेला साडी, पुरुषांना शर्टपीस आणि पँट पीस, लहानग्यांना फराळ देत प्रत्येकाची दिवाळी गोड करण्याचा एक छोटासा प्रयत्न केला.

या प्रयत्नातून गरिबांची दिवाळी आनंदात साजरी झाल्याचे अनेकांनी सांगितले. यावेळी प्रतिष्ठाचे अनेक सभासद, तसेच शैक्षणिक, सामाजिक श्रेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेलच्या बल्लालेशवार तलावाच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहगड किल्लेची प्रतिकृति सकारलेली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- Tally ERP 9 झालेली दोन वर्षाचा अनुभव असलेली लेडीज झिराड येथे हवी आहे mob - 8007893232 पगार - १५००० ते १८०००, ९४२१९५४३४८.
- प्रथम, घटस्फोटित, विधुर, विधवा, व्यंग सर्वजातीय स्थळांसाठी रोहा, गणेश महाकाळ : ८८८८९३५७७५
- LED TV वॉल माऊंटींग रिपेरिंग ८४२१३९५६४६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

धर्मापुरी किल्ल्याची प्रतिकृती ठरतेय आकर्षण

नाईक कुटुंबियांनी जपली ३५ वर्षांची परंपरा

। कोर्लई । वार्ताहर ।
दिवाळीचा सण म्हटला की सर्वत्र मातीचे किल्ले बनविण्याची परंपरा आहे. अगदी बच्चे कंपनीपासून घरातील मोठी माणसेसुध्दा किल्ले बनविण्यात मग्न होतात. मात्र काही वर्षानंतर हा उपक्रम बंद करतात. मात्र याला अपवाद आहेत मुरुड जंजिरा येथील कुंभारवाड्यातील नाईक कुटुंबीय. हे कुटुंब गेली ३५ वर्ष दिवाळीनिमित्ताने मातीचे किल्ले बनवीत आहेत.

१९८७ साली प्रभात दत्तात्रेय नाईक यांनी आपल्या घरी पहिल्या किल्ल्याची प्रतिकृती बनविली होती. ती प्रतिकृती शेतातील माती, पुठ्ठा, नळीचे कौल, याचे वापर करून. त्यानंतर आजपर्यंत प्रत्येक वर्षी यांनी आपल्या घरी अंगणात मातीच्या किल्ल्यांची प्रतिकृती बनविली आहे. त्यांचे दिवाळीनिमित्ताने किल्ला बनविण्याचे यंदाचे हे ३५ वे वर्ष आहे. या कालावधीत किल्ल्यांच्या प्रतिकृतीसाठी आतापर्यंत त्यांना १६ वेळा पारितोषिके मिळाली आहेत.

यंदा त्यांनी बीड जिल्हा येथील परळी वैजनाथ जवळील धर्मापुरी येथील किल्ले धर्मापुरी याची प्रतिकृती तयार केली आहे. त्याच बरोबर किल्ल्याची माहिती देणारे फलक ही सोबत लावलेले आहे.

यंदा किल्ल्याच्या मागील बाजूला त्यांनी शिवकालीन निवडक शस्त्रांचे प्रदर्शन मांडले आहे. जेणेकरून शिवकालीन शस्त्र कशी होती याची माहिती मुलांना मिळावी हा दृष्टीकोन ठेवला आहे.

प्रभात नाईक हे पनवेल येथे प्राथमिक शिक्षक आहेत. त्यांचे मोठे भाऊ संतोष नाईक त्यांना मदत करत. किल्ल्यांची प्रतिकृती तयार करताना ते प्रभात नाईक यांना मार्गदर्शन आणि मदत करीत असतात. किल्ला बनविताना त्यांचे वडील दत्तात्रेय नाईक यांची त्यांना नेहमी मदत व्हायची. किल्ल्याला पाणी मारणे, झाडे लावणे, त्यात मेथी पेरणे ही कामे ते करीत. काही छोटी छोटी झाडे ते किल्ल्यात लावीत असत.

यंदाची प्रतिकृती करण्यासाठी दोन बैलगाडी माती, रंग कागद याचा वापर त्यांनी केला आहे.

घरी सलग ३५ वर्ष किल्याची प्रतिकृती बनविण्याचा विक्रम त्यांनी मुरुडमध्ये केला आहे.आतापर्यंत त्यांनी जंजिरा, पद्मदुर्ग उर्फ कासा, सिंहगड, राजगड, रायगड, तोरणा, नळदुर्ग, कर्नाळा, प्रतापगड, भरतगड, सोनेरिगड, अजिंक्यतारा, मल्हारगड, विजयदुर्ग आदी प्रतिकृती त्यांनी तयार केल्या आहेत. किल्ल्यासोबत किल्ल्यावर आधारित काव्य, माहिती, फोटो, माहिती देणारे फलक अशी उभारणी ते करीत असतात.

फॅन्सी नंबर प्लेटची डोकेदुखी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक परिवहन कार्यालयातून वाहनांसाठी दिलेल्या नंबरचा दुरुपयोग होत आहे. शहरासह ग्रामीण भागांत वाहनांवर बसवलेले रंगबिरंगी तसेच विचित्र आकारातील फॅन्सी नंबरच्या पाट्यांमुळे गुन्हा किंवा अपघात प्रसंगी वाहनांचा क्रमांक ओळखणे कठीण झाले असल्याने वाहतूक पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे.

दुचाकी अथवा चारचाकी वाहन खरेदी केल्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनाची नोंदणी नंतर वाहनक्रमांक नंबर दिला जातो. मात्र, वाहन क्रमांक वेगवेगळ्या

पोलिसांची डोकेदुखी वाढली

पद्धतीने लिहिण्यात येत असल्याने अपघात झाल्यावर किंवा गुन्हा घडल्यानंतर वाहन क्रमांक ओळखणे कठीण होते. अशातच सध्या पनवेल तालुक्यातील विविध मार्गांवर हजारो वाहनचालक रंगबिरंगी क्रमांकाच्या पाट्या बसवून फिरत आहेत. यात राजकीय नेते, कार्यकर्ते व पदाधिकारी आघाडीवर असल्याने

> फॅन्सी नंबर प्लेट बनवणाऱ्या वाहनांवर पनवेल परिवहनकडून वारंवार कारवाई केली जाते. अशा प्रकारे वाहन क्रमाकांत कोणताही बदल करू नये, अशा सूचनाही देण्यात येतात. परंतु, हौसेखातर वाहनधारकांकडून असे प्रकार घडत आहेत.
>
> – गजानन ठोंबरे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल

असे क्रमांक नोंदवताना पोलिसांना मोठी कसरत करावा लागते. विशेष म्हणजे, पनवेल आरटीओ तसेच वाहतूक विभागाने फॅन्सी नंबर प्लेटवर अनेकदा कारवाई केली आहे. मात्र, तरी नियम मोडणाऱ्यांची संख्या वाढतच आहे.

वाहतूक पोलिसांची वाढली डोकेदुखी

मोटर वाहन कायद्याचे उल्लंघन

मोटर वाहन कायद्यानुसार वाहनांच्या क्रमांक पाट्यांवरील अक्षरे आणि क्रमांक स्पष्टपणे दिसावा, असा रीतीने लावण्याचे निर्देश आहे. मात्र, या नियमांचे वाहन चालक उल्लंघन करतात यासाठी वाहतूक पोलिसांनी कडकपणे उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच दोन दोन ते तीन वर्ष वाहन खरेदी करून झाल्यावर ही अनेक जण वाहन क्रमांक टाकण्यास टाळाटाळ करीत आहे.

ब्राह्मण सभेची 'दिवाळी पहाट'

। आपटा । वार्ताहर ।

मोहोपाडा येथील गणपती मंदिर परिसरात रसायनी ब्राह्मण सभेकडून सोमवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गायक शकुन आपटे, गौरी बागुल, आरती दवे व विष्णु जोगळेकर यांनी बहारदार गाण्यांच्या सादरीकरण करीत कार्यक्रमाला रंगत आणली.

दरम्यान, दोन तासांहून अधिक काळ रंगलेल्या या कार्यक्रमांत गायकांनी विविध गाणी सादर करुन रसिकांना मेजवानीच दिली. यावेळी तबला साथ राकेश कुलकर्णी व नचिकेत कोशे यांनी, तर संवादिनी शेखर आंबवणे व की बोर्ड वादन साहिल सोमण यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन संध्या कुलकर्णी यांनी केले. यावेळी सर्व गायक, वादक व प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी चौकच्या ब्राह्मण सभेचे अध्यक्ष श्री. जोशी उपस्थित होते. रसायनी ब्राह्मण संस्थेचे अध्यक्ष बी.एस. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली प्रथम असा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यास सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोधचिन्हाचे उद्घाटन

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एम आयडीसी जवळील सारसई या दुर्गम भागातील सारसई या नावाचे (बोधचिन्हाचा) उद्घाटन सोहळा केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी आपटा ग्राम पंचायतीच्या सरपंच नाजणीनताई पटेल, मनीषा वाघे, कीर्ती कदम, संगीता बावदाने, रत्नाकर घरत आदीसह ग्रामस्थ गोविंदावाडी, टपोरावाडी, बागेचीवाडी, धनगरवाडा, खडकीचीवाडी, माडभोनवाडी, सोनारवाडी, टोकाचीवाडी, पळसवाडी, सारसई विभागातील असंख्यात ग्रामस्थ उपस्थित होते. स्थानिकांनी समाजसेवक संतोष शिंगाडे यांचे आभार मानले.

तुकाराम सावंत यांचे निधन

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील विठ्ठलवाडी गावचे रहिवासी असणारे तुकाराम शिवराम सावंत यांचे मंगळवार दि.७ नोव्हेंबर रोजी वयाच्या सुमारे ७० व्या वर्षी अल्पशा आजाराने राहत्या घरी दु:खद निधन झाले. शेती व्यवसायाबरोबरच मुंबईमध्ये कामधंदा करणारे सावंत हे प्रेमळ होते. त्यांना सामाजिक कार्याची विशेष आवड होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी गुरू.दि.१६ नोव्हेंबर रोजी तर अंतिम धार्मिकविधी रविवार दि.१९ नोव्हेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

गारंबीवर पर्यटकांची रेलचेल

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

निसर्गसौंदर्याची खाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुरूड तालुक्याला प्रतिवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. फेसाळणारे धबधबे, गार वारा, उंच डोंगरावर धुक्यातील झालरीतून दिसणारी हिरवाई अशा सगळ्या रोमांचकारी क्षणांना अनुभवण्यास पर्यटकांना मुरूड तालुक्यातुन पर्यटन क्षेत्रातून मिळत असतो. त्यापैकी मुरुड शहरापासून सात किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गारंबी धबधबा याठिकाणी जाताना नागमोडी वाटा, कच्चा रस्ता, पक्षांची किलबिलाट, हिरवा शालू नेसलेल्या टेकड्या, वृक्ष, वेली या निसर्गाच्या सानिध्यामुळे या धबधब्याचे सौदर्य अजूनच खुलून दिसत असते. अशा आल्हाददायक वातावरण पर्यटकांना एक मेजवानीच ठरत असते. त्यामुळे साहजिकच या ठिकाणी यावेळी पर्यटकांची स्थानिकांची मोठय़ा प्रमाणात गर्दी होतांना दिसून येत आहे.

यादवराव तासगावकर महाविद्यालयाला नॅक 'अ' मानांकन

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या यादवराव तासगावकर फार्मसी महाविद्यालयाला राष्ट्रीय विद्यापीठ म्हणून नॅक मानांकन मिळाले आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद यांनी तीन आणि चार नोव्हेंबर रोजी या महाविद्यालयाचे सर्वेक्षण आणि मूल्यांकन केले होते.

तालुक्यात चांधई येथे यादवराव तासगावकर शैक्षणिक संकुल सरस्वती एज्युकेशन ट्रस्टकडून उभारण्यात आले आहे.२५ वर्षात या संस्थेने अभियांत्रिकी, मेडिकल, औषधी, नर्सिंग, प्रायमरी या क्षेत्रात तब्बल ५० हून अधिक महाविद्यालये यांची साखळी निर्माण केली आहे. या संस्थेच्या यादवराव तासगावकर फार्मसी महाविद्यालयाला राष्ट्रीय स्तरावरील नॅकचे 'अ' मानांकन मिळाले आहे. अशी माहिती राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद यांनी आपल्या वेब साईट वर जाहीर केली आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यात

> आमच्या संस्थेसाठी हा मोठा बहुमान असून आमच्या महाविद्यालयाला नॅक 'अ' मानांकन मिळाले आहे. त्यामुळे आता येथील शैक्षणिक गुणवत्ता राखण्याची मोठी जबाबदारी आमच्यावर आली आहे. आणखीन आधुनिक करण्यासाठी प्रयत्न आणि योगदान देण्याची महत्वाची जबाबदारी आमच्यावर आहे.
>
> –डॉ रुपाली तासगावकर

शैक्षणिक संकुल विकसित करणाऱ्या तासगावकर समूहाच्या महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर यांच्या मार्गदशनाखाली प्राचार्य म्हणून डॉ. रुपाली राजेश तासगावकर यांच्याकडे कार्यभार आहे.प्राचार्य आणि त्यांच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या दिवसरात्र घेतलेल्या परिश्रमाला योग्य न्याय मिळाला असून सदर महाविद्यालयाला दिवाळीची गोड भेट मिळाली आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ.रूपाली भालचंद्र पाटील, रा.चेंढरे, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांचा खालील नमुद मिळकतीमध्ये कै.स्नेहलता अर्जुन पारकर यांची वारस कै.सुनंदा कृष्णा कदम यांची वारस म्हणून अविभाज्य हिस्सा व हक्क हितसंबंध आहे.

मिळकतीचे वर्णन

जुना सर्व्हे नं	नवीन गट नं	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)	मौजे
५१०	१७४	०-६९-३०	१३.३५	नांदाईपाडा ता.अलिबाग, जि.रायगड

वरील मिळकत ही सामाईक मिळकत असून सदरची मिळकत ही आमचे अशिलांचे पुर्वापार यांचे मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी इतर हक्कांत आमचे अशिलांचे कुटुंबाच्या हिश्श्याबाबत नोंद करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे हक्क हितसंबंध व अविभाज्य हिस्सा असून सदर मिळकतीमध्ये काही इसम त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करण्याचे तयारीत आहेत. तसा कुठलाही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष कोणीही केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल व तसे केल्यास सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार होणार नाहीत तसेच अशाप्रकारचा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. सदर मिळकतीबाबत असा कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्ट कारवाईस संबंधीत इसम जबाबदार राहतील हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : /११/२०२३

ॲड.पराग मधुकर गुरव
जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग
मोबा.९३२६१३१४८०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे. तिवरे ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

बिनशेती मिळकतीचे वर्णन
मौजे.तिवरे ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

जमिन मालकाचे नाव	स.नं.	हिस्सा नं.	क्षेत्र आर.चौ.मी	आकार रू.पै.
अंजनी कुमार ठाकुर नेहा वैभव वारूळे उर्फ नेहा ठाकूर	२	४/अ/४	२-८०-००	२८-००

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१४/११/२०२३

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ॲड.किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे कुशिवली, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अनंता झिल्या पाटील वगैरे ३ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे कुशिवली, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
४५	२/अ	०-५०-७०	७-१९

तसेच बाळाराम चाहु बेडेकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे कुशिवली, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
४५	२/क	०-०६-६०	०-८७

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१५/११/२०२३
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
समीर हरिश्चंद्र लाड
शॉप नं.५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे नोटीस अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन
१) मौजे-धामणी, ता.कर्जत जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रूपये	आकार पैसे
उदयन दिलीप शिंदे	१७३	७	०-३४-००	०	३०
सिमा दिलीप शिंदे व इतर	१७३	१५ क	०-०६-००	०	०५
सिमा दिलीप शिंदे व इतर	१७३	३	१-०२-००	०	९५

२) मौजे-मचेकरवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रूपये	आकार पैसे
मनिषा विवेक कोरडे	३८	१	०-७२-००	०	५५
सिमा दिलीप शिंदे व इतर	३८	७	०-३८-००	०	२२
मनिषा विवेक कोरडे	५६	२	०-०५-००	०	०५
सिमा दिलीप शिंदे व इतर	४२	१	०-१४-००	०	१०
उदयन दिलीप शिंदे	४१	८	०-४६-००	०	४५

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता- फ्लॅट नं.४, ए-विंग,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत
नगरपालिकाशेजारी, ता.कर्जत जि.रायगड
४१०२०१

सही/-
ॲड.जयेश संभाजी म्हसे
दिनांक : १६/११/२०२३
मो नं. ९०२८९८२२७७
ई मेल-adv.jayeshmhase@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे बीड बुद्रुक, ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुहेल महंमदसिद्धीक बुधा वगैरे ३ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे बीड ब्रुद्रुक, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
१९	२/अ	०-४०-७०	०-३४
२०	१	०-०६-८०	०-०४
२१		०-२०-००	०-४७
२२	२	०-१४-२०	०-२५
२२	३/अ	०-१४-७०	०-१४

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१५/११/२०२३
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
समीर हरिश्चंद्र लाड
शॉप नं.५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड

जाहीर नोटीस

आमचे अशिल १) नलिनी श्रीराम म्हात्रे २) श्रीराम शिवराम म्हात्रे, यांचे वतीने सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती या 'मालकाचे नाव' कॉलममधे नमूद व्यक्तीच्या मालकीच्या आहेत.

१) मौजे-गोफण ता.रोहा, जि.रायगड, यांचे हद्दीतील जमिन मिळकत जीचे वर्णन खालीलप्रमाणे :- (बागायती जमिन)

गट नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.	मालकाचे नाव
७०	१-२४.२० पो.ख.०-१७.८० १-४२.००	०=८२	नलिनी श्रीराम म्हात्रे श्रीराम शिवराम म्हात्रे

२) मौजे-वराठी ता.रोहा, जि.रायगड यांचे हद्दीतील जमिन मिळकती ज्यांचे वर्णन खालीलप्रमाणे:-

गट नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.	मालकाचे नाव
५५/४/अ	१-४८.० पो.ख.०-०७.० ०-५५.०	०=३५	श्रीराम शिवराम म्हात्रे
५५/४/ब	०-६१.० पो.ख.०-०९.० ०-७०.०	०=४७	श्रीराम शिवराम म्हात्रे
५५/५/ब २	१-५६.५० पो.ख.०-०७.५० १-६४.००	१=००	श्रीराम शिवराम म्हात्रे

३) मौजे-महाळुंगे ता.रोहा, जि.रायगड, यांचे हद्दीतील जमिन मिळकत जिचे वर्णन खालीलप्रमाणे:-

गट नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.	मालकाचे नाव
३९७	०-४४.० पो.ख.०-०९.० ०-५३.०	०=६६	श्रीराम शिवराम म्हात्रे
४२०	०-५२.० पो.ख.०-११.० ०-६३.०	०=७५	श्रीराम शिवराम म्हात्रे

येणेप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांचे मालकी वहिवाटीच्या असून त्या मिळकती योग्य किंमत आल्यास आमचे अशिलास विक्री करण्याच्या आहेत. सदर नोटीस मालकी हक्क तपासणेकरीता व स्थानिक बाजारभाव पडताळण्याकरीता मुख्यत्वे करून आमचे अशिल तर्फे दिलेली आहे. सदर नोटीसप्रमाणे ज्यांस सदर मिळकती खरेदी करण्यास स्वारस्य आहे त्यांनी कृपया खाली सही करणार यांच्याशी संपर्क साधावा. हे कळावे.

रोहा,
दि.१४/११/२०२३
जमिन मालक संपर्क
नं.९२२१६००७०६

सही/-
ॲड. महेंद्र (गणेश) डी.पाटील
वात्सल्य 'बंगला, छत्रपती शिवाजी चौक,
मंगलवाडी, रोहा मु.पो.ता.रोहा, जि.रायगड.
मोबा.९४२२०९४९३८/९२२६२५५५५०

अलिबाग नगरपरिषद

अलिबाग-रायगड

जाहीर निविदा सूचना क्र.११

अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील काम करण्यासाठी सिलबंद निविदा मान्यताप्राप्त व सक्षम पात्रता असलेल्या पालिकेच्या विषयीच्या अटी व शर्तीची पूर्तता करीत असलेल्या कंत्राटदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	इसारा रक्कम	कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत	काम पूर्ण करण्याची मुदत	ठेकेदाराची पात्रता
१.	अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील पी.एन.पी. मच्छिमार्केट जवळ गटार व स्लॅबचे बांधकाम करणे.	४,४८,१६७/-	५०००/-	५००/-	३० दिवस	सार्वजनिक बांधकाम विभागाचे सक्षम नोंदणीकृत असलेला

कोऱ्या निविदा नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिनांक १६/११/२०२३ पासून दिनांक २३/११/२०२३ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळता देण्यांत येतील. प्रत्येक कामाच्या सिलबंद निविदेसोबत रोख स्वरूपात इसारा रक्कम भरल्याची मूळ पावती बंद लिफाफ्यात भरून जोडणेची असून प्रत्येक कामाची सिलबंद निविदा दिनांक २४/११/२०२३ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळता सादर करणेची आहेत. या वेळेनंतर आलेल्या तसेच अपुऱ्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदा मुख्याधिकारी शक्य असल्यास त्यांचे दालनात निविदाधारक उपस्थित असलेत त्यांचेसमोर दिनांक २८/११/२०२३ रोजी सायं.५-०० वाजता उघडतील. अपुऱ्या अगर चुकीच्या माहिती भरलेल्या निविदा तसेच निविदेमध्ये खाडाखोड केलेल्या निविदा विचाऱ्यात घेतल्या जाणार नाहीत. तसेच नगरपरिषद कार्यालयात कोरे निविदा फॉर्म मिळतील, कोणतेही एक किंवा सर्व निविदा पत्रके कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

निविदेसोबत सविस्तर माहिती नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत बांधकाम विभागात मिळेल.

सही/-
(अंगाई साळुंखे)
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद,

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

मुदतवाढ सूचना क्र.३
ई निविदा सूचना क्र.६३/२०२३-२०२४ (मुंबई) करीता

दिनांक २०/०९/२०२३ रोजी दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक हमारा महानगर, मुंबई, दैनिक कृषीवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव
१	रोहा औद्योगिक क्षेत्र....अनिवासी इमारत.. रोहा औद्योगिक क्षेत्रात नवीन अतिथीगृहाचे बांधकाम करणे.

आता सदर कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २१/११/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करून किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

क्रीडा नवलक

रांगोळी स्पर्धेत रीना प्रथम

चिरनेर : उरण तालुक्यातील मोठेभोम येथील रोरया ग्रुपच्या वतीने दिवाळी सणाचे औचित्य साधून, आयोजित करण्यात आलेल्या, गड किल्ले व रांगोळी स्पर्धेत पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यम स्कूलच्या शिक्षिका रीना प्रफुल्ल केणी या प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्या आहेत.त्यांनी रेखाटलेल्या रांगोळीतून बेटी बचाव, बेटी पढाव हा सामाजिक संदेश दिला होता. तर गड किल्ले स्पर्धेत हर्षित रमेश केणी व हिमांशू प्रफुल्ल केणी यांच्या ग्रुपला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

धमकी देणारा अटकेत

मुंबई : भारत विरूद्ध न्युझीलंड सामन्यावेळी घातपात करण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. धमकी देणारा तरुण कोहलीचा मोठा चाहता आहे. याने धमकी का दिली याचा तपास पोलिस करत आहेत. ट्विटरवर मुंबई पोलिसांना बंदूक आणि गोळ्यांच्या फोटो टॅग करण्यात आला होता. सामन्यादरम्यान आम्ही आग लावू, असा संदेश देणारा फोटोही पोस्ट केला होता. या घटनेची दखल घेत चोख पोलिस बंदोबस्त ठेवला.

खेळपट्टी बदलल्याचा आरोप

मुंबई : विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य फेरीमध्ये भारत आणि न्यूझीलंड एकमेकांशी भिडणार आहेत. हा सामना वानखेडे स्टेडियमवर जिथे पहिला चेंडू टाकण्यापूर्वीच खेळपट्टीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. वानखेडेच्या खेळपट्टीचे स्वरूप एका रात्रीत बदलले असून भारतीय संघ व्यवस्थापनाच्या सांगण्यावरून हे घडल्याचे वृत्त आहे. बेंगळुरूमध्ये नेदरलँड्सविरुद्धचा सामना खेळल्यानंतर भारताने वानखेडेच्या पिच क्युरेटरला स्लो ट्रॅक तयार करण्यास सांगितले होते.

कोचची हकालपट्टी?

लाहोर:विश्वचषक स्पर्धेतील सुमार कामगिरीनंतर पाकिस्तान क्रिकेट संघाच्या कोचिंग कर्मचाऱ्यांमधील सर्व परदेशी चेहरे बाहेर होण्याची शक्यता आहे. यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड तातडीची बैठक बोलावणार आहे, त्यानंतर पाकिस्तान संघाच्या सर्व परदेशी प्रशिक्षकांना बडतर्फ केले जाऊ शकते.अशी चर्चा सुरु आहे. पाकिस्तान संघाच्या प्रशिक्षण चमूमध्ये वरच्या पदांवर जास्त परदेशी चेहरे आहेत. यामध्ये ब्रॅडबर्न ,अँड्रू पुटिक यांचा समावेश आहे.

ऑस्ट्रेलिया मालिकेतून पांड्या बाहेर

मुंबई : विश्वचषकानंतर भारत ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिका खेळणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघातील खेळाडूंची बुधवारी घोषणा करण्यात येणार आहेत. मात्र याआधी भारतीय संघाला मोठा झटका बसला आहे. भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू आणि उपकर्णधार हार्दिक पांड्या भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० मालिकेचा भाग असणार नाही. भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेतील पहिला सामना २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

नाणेफेकीचा निर्णायक कौल!

'बाद फेरी गाठण्याचे पाकिस्तानचे स्वप्न दहा सेकंदात उद्ध्वस्त झालं.' असं पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू रमीझ राजा समालोचन करताना म्हणाला. असं की दहा सेकंदात काय सामावलेलं होतं. ज्यामुळे रमीझ राजा उद्विग्न होऊन म्हणाला होता. ही दहा सेकंद म्हणजे नाणेफेकीसाठीचा अवधी इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याच्या निर्णयासाठी लागलेला तो १० सेकंदाचा अवधी. कारण प्रथम फलंदाजी करुन चांगली धावसंख्या फटकावून पाकिस्तानला विजयासाठी किमान प्रयत्न तरी करता आला असता. त्या १० सेकंदाच्या अवधीने पाकिस्तानचे विश्वचषक २०२३ चे आव्हान त्याक्षणीच संपुष्टात आणले.

खरं तर प्रत्येक खेळामध्ये नाणेफेकीसाठीचा अवधी निर्णायक असतो. कारण नाणेफेक तुम्ही मैदान, खेळपट्टी कोर्ट किंवा अन्य गोष्टींचा लाभ सर्वप्रथम घेऊ शकता. ज्या गोष्टीचा सामन्याच्या निकालावर काही प्रमाणात परिणाम होत असतो. क्रिकेटमध्ये हा प्रभाव दिसतोच. पण अन्य खेळही आहेत. ज्यामध्ये नाणेफेक जिंकणाऱ्या संघाचा नेहमीच वरचष्मा असतो. फुटबॉल किंवा हॉकीसारख्या खेळात प्रथम पेनल्टी घेण्याचा बहुमान जर नाणेफेकीच्या कौलामुळे तुम्हाला मिळाला असेल तर नेहमीच तुम्ही पेनल्टी शूटआऊटमध्ये आघाडीवर असतात आणि आकडेवारी सांगते की प्रथम पेनल्टी घेणारे ६० टक्के संघ जिंकतात. फुटबॉलमध्ये कबड्डीप्रमाणे नाणेफेक जिंकणाऱ्या संघाला अंगण निवडण्याची संधी असते. काही फुटबॉल क्लब आणि त्यांचे नाणेफेक जिंकणारा संघ करीत असतो. लिव्हरपूल फुटबॉल क्लब नेहमीच नाणेफेक जिंकून आपल्या अंगणाची निवड करीत असतो. टेनिसमध्ये प्रथम सर्व्हिस करणाऱ्याला नेहमीच आघाडीवर राहण्याची संधी मिळते. कॅरमसारख्या खेळातही नाणेफेक जिंकून ब्रेक टू फिनिश करता येते.



बऱ्याचवेळा मैदानावरील संघर्ष सामना निकाली ठरवू शकला नाही तर नाणेफेकीचा आधार घेऊन विजेता किंवा विजयी संघ निश्चित करता येतो. म्हणूनच काही वेळा नाणे उडविण्याच्या शैलीचा अभ्यास करुन अचूक निदान करण्याची कला काहींनी आत्मसात केलेली असते. कारण बऱ्याच क्रीडा प्रकरणांमध्ये नाणेफेकीचा निर्णय काही अंशी लाभदायक किंवा निर्णायक ठरत असतो.

Krimson Cerise
+91 9930919807
niharika.dalvi@krimsoncerise.com

क्रिकेटमध्ये तर नाणेफेकीला महत्व अधिक आहे. पाकिस्तानने नाणेफेक जिंकली असतीतर कदाचित प्रथम फलंदाजी करुन मोठी धावसंख्या उभी करुन इंग्लंडला आव्हान दिले असते. किमान त्यांना लढण्याची एक संधी मिळाली असती.

एरव्ही नाणेफेक महत्त्वाचीच असते. खेळपट्टीवर जर अधिक गवत ठेवण्यात आले असेल तर वेगवान गोलंदाज असणारा संघ त्या खेळपट्टीवर प्रथम गोलंदाजी करण्याची योजना आखून सज्ज असतो. काही वेळा खेळपट्टीवर असलेल्या ओलसरपणाचा लाभ नाणेफेक जिंकणाऱ्या संघाला घेता येतो. प्रतिपक्षाची कोंडी त्यांचे गोलंदाज करु शकतात. भारतासारख्या उष्ण कटिबंदाच्या देशात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेऊन आपल्या अन्य ९ खेळाडूंना वातावरणातील उष्णतेपासून दूर ठेवता येते.

काही वेळा प्रथम ठणठणीत असणाऱ्या खेळपट्टीवर फलंदाजी करुन मोठी धावसंख्या उभारण्यासाठी नाणेफेकीच्या अनुकूल कौलाचा उपयोग करता येतो. काही वेळा खेळपट्टी मुद्दामच कोरडी ठेवून किंवा त्यावर ओरखडे काढून खराब केलेली असते. अशावेळी दुसऱ्या डावात फलंदाजी करणे हे मोठे आव्हान असते. कारण खेळपट्टी तुटली तर प्रतिपक्षाचे गोलंदाज तुमचा खुर्दा उडवू शकतात. अशावेळी काही वेळा नाणेफेक हरणे हे देखील लाभाचे ठरु शकते. कारण काही निर्णय प्रतिपक्षाने घेतले आणि चुकले तर ते आपल्याच फायद्याचे ठरतात.

कसोटी क्रिकेटमध्ये तर नाणेफेकीचा कौल महत्त्वाचा ठरतोच. कारण खेळपट्टी चौथ्या डावात खराब झाल्यानंतर फलंदाजी करणे आव्हानच असते. मात्र अडीचशे वर्षांची नाणेफेकीची ही परंपरा बंद करण्याचा इंग्लीश कौंटी क्रिकेट गंभीरपणे विचार करीत आहे. केवळ काहीतरी वेगळे करावे यासाठी.

न्यूझीलंडसमोर धावांचा 'विराट' डोंगर

भारताने दिले ३९८ धावांचे आव्हान; विराट कोहली-श्रेयस अय्यरची शतके

। मुंबई । वृत्तसंस्था ।

विराट कोहलीचे महाशतक आणि श्रेयस अय्यसच्या शतकांच्या जोरावर भारताने उपांत्य फेरीच्या विजयाचा भक्कम पाया रचला आहे. कोहलीने यावेळी आपले ५० वे शतक साजरे करत सचिन तेंडुलकरचा जागतिक विक्रम मोडीत काढला. कोहली बाद झाल्यावर श्रेयसने आपले शतक साजरे केले. त्यामुळेच भारताने या सामन्यात धावांचा डोंगर रचला आणि त्यामुळे त्यांनी विजयाचा पाया रचल्याचे यावेळी पाहायला मिळाले. कोहलीने यावेळी ११३ चेंडूंत ९ चौकार आणि २ षटकारांच्या जोरावर ११७ धावांची नेत्रदीपक खेळी साकारली. श्रेयसने यावेळी ७० चेंडूंत १०५ धावांची धमाकेदार शतकी खेळी साकारली. भारताने यावेळी ३९७ धावा करत विजयाचा पाया रचला. शुभमन गिलने ६६ चेंडूत ८० तर कर्णधार रोहित शर्माने २९ चेंडूत ४७ धावा केल्या. न्यूझीलंडकडून टीम साऊदीने २ बळी घेतले.

रोहित नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीला आला आणि त्याने एकामागून एक फटक्यांची अतिषबाजी केली. रोहीतने यावेळी न्यूझीलंडच्या गोलंदाजीवर सुरुवातीपासून कडक प्रहार करायला सुरुवात केली. घरच्या मैदानावर फक्त २९ चेंडूत ४७ धावा केल्या. मात्र स्पर्धेतील चौथे अर्धशतक त्याला पूर्ण करता आले नाहीत. मीड ऑफच्या दिशेने मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात टिम साउदीच्या चेंडूवर तो बाद झाला. रोहितने या खेळीत ४ चौकार आणि चार षटकार मारले. घरच्या मैदानावर फक्त २९ चेंडूत ४७ धावा केल्या.

तर रोहितने एका विश्वचषकामध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा गेलचा विक्रम मोडला. गेलने २०१५च्या विश्वचषकामध्ये २६ षटकार मारले होते. आता रोहितच्या नावावर २७ षटकार झाले आहेत. २३व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर शुभमन दुखापग्रस्त झाला. त्याच्या जागी श्रेयस अय्यर फलंदाजीला आला. गिलच्या मदतीला अस्थिव्यंग तज्ञ मैदानात आले होते. मात्र अस्थिव्यंग तज्ञांसोबत चर्चा करून गिलने मैदान सोडले. गिलने ६५ चेंडूत ३ षटकार आणि ८ चौकारांसह ७९ धावा केल्या.

पॉवरप्लेमध्ये भारताची सुरुवात वेगवान झाली. संघाने पहिल्या १० षटकांत ८.४ धावगतीने फलंदाजी केली. सलामीवीर रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी पहिल्याच षटकात १० धावा देत न्यूझीलंडवर दडपण आणले. ट्रेंट बोल्ट आणि टीम साऊथीचा छोटा स्पेल ५ षटके टिकला. कर्णधार विलयम सनने सहाव्या षटकात फिरकीपटू सँटनरला आणले.नवव्या षटकात टीम साऊदीसमोर मोठा फटका खेळून रोहित शर्मा बाद झाला. त्याने २९ चेंडूत ४७ धावांची खेळी खेळली आणि गिलसोबत ७१ धावांची भागीदारी केली.

रायगडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

समिधा तांडेल, आर्या गडाडे राखीव खेळाडू

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशने महाराष्ट्राचा १५ वर्षांखालील मुलींचा संघ जाहीर केला आहे. या संघात रायगडची खेळाडू रोशनी पारधी हिची निवड करण्यात आली आहे. रायगडच्या समिधा तांडेल व आर्या गडाडे यांची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे, अशी महिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेल्या १५ वर्षाखालील मुलींच्या निमंत्रित संघांच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या संघातून खेळताना रोशनी पारधी हिने अष्टपैलू कामगिरी केली. याच स्पर्धे तील कामगिरी पाहून महाराष्ट्राचा संभाव्य संघ निवडण्यात आला होता. या संघाच्या सराव शिबीरातून महाराष्ट्राचा १५ खेळाडूंचा अंतिम संघ निवडण्यात आला. या अंतिम संघात रोशनी पारधी हिची निवड करण्यात आली. रायगडच्या समिधा तांडेल व आर्या गडाडे यांची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. रायगडच्या या खेळाडूंना रायगड संघाच्या प्रशिक्षक राजश्री अडबळ यांचे मार्गदर्शन लाभले.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, कार्याध्यक्ष प्रदीप नाईक, उपाध्यक्ष प्रकाश पावसकर यांनी तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

संदीप पाटील राज्यस्तरीय क्रीडा पुरस्काराने सन्मानित

। उरण । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यमुनाई फाउंडेशन संस्कार वाचनालय नवी मुंबईतर्फे गुरुव ज्ञाती हॉल, वाशी नवी मुंबई येथे राज्यस्तरीय मातृवंदन पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी उरण तालुक्याचे आदर्श क्रीडा प्रशिक्षक संदीप पाटील यांना राज्य तरीय क्रीडा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संदिप पाटील यांनी आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना बुध्दिबळ खेळाचे उत्तम असे प्रशिक्षण देऊन गुणवान विद्यार्थी घडविले आहेत.

उरण तालुका बुद्धिबळ असोसिएशनची स्थापना करून बुद्धिबळ या खेळाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला. अनेक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.अनेक ठिकाणी स्पर्धेत संदिप पाटील यांनी पंच म्हणूनदेखील काम केले. रायगड जिल्हा सेक्रेटरी व महाराष्ट्र राज्य बुध्दिबळ संघटनेचे कार्यकारी सदस्य म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले.

जेएनपीटीच्या माध्यमातून अखिल भारतीय मेजर पोर्ट ट्रस्ट स्पर्धेत त्यांनी उत्तम कामगिरी देखील केली आहे. या सर्व कार्याची दखल घेत यमुनाई फाउंडेशन वाशी नवी मुंबई या सामाजिक संस्थेच्या वतीने संदीप पाटील यांना राज्यस्तरिय क्रीडा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

भारत-न्यूझीलंड सामन्यासाठी क्रीडा रसिकांची गर्दी

डेव्हिड बेकहॅम, सलमानपासून ते नीता अंबानीपर्यंत दिग्गजांची हजेरी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

जेव्हा आपण क्रिकेट विश्वचषकातील भारत विरुद्ध न्यूझीलंड सामन्याबद्दल बोलतो तेव्हा आपल्याला २०१९चा पराभव, धोनीचे अश्रू, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचे निराश चेहरे आठवतात. आज बदला घेण्याची ही योग्य संधी आहे.

आज क्रिकेट विश्वचषक २०२३चा उपांत्य सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरु झाला. आजच्या सामन्यासाठी डेव्हिड बेकहॅम पासून ते मनोरंजन क्षेत्रातील कलाकारांपर्यंत सर्वांनी स्टेडियममध्ये हजेरी लावली होती.

याच मैदानावर भारताने दुसरा विश्वचषक (२०११) जिंकला होता. लाखो क्रिकेट चाहत्यांना स्टेडियममधून या सामन्याचा आनंद घ्यायचा आहे, परंतु ही संधी फक्त काही हजार लोकांनाच मिळेल . आजच्या सामना पाहण्यसाठी बॉलीवूड स्टार्सही स्टेडियममध्ये उपस्थित आहेत. त्यात सलमान खान, आमिर खान, रणबीर कपूर यांच्या नावांचा समावेश आहे. दुसरीकडे, माजी दिग्गज फुटबॉलपटू डेव्हिड बेकहॅम देखील या सामन्याचे साक्षीदार असणार आहेत.

सचिन तेंडुलकर समवेत तो स्टेडियममध्ये बसला आहे. भारतीय संघाला पाठिंबा देण्यासाठी सारा तेंडुलकर, शाहरुख खानची मुले आणि अनेक बॉलिवूड स्टार्स यांच्या घरातील लोकही सामना पाहण्यासाठी आलेले होते. जर वानखेडे स्टेडियमबद्दल बोलायचे झाले तर, ३२ हजार लोकांची सोय आहे. आज स्टेडियममध्ये सुमारे ३३ हजार लोक उपस्थित होते.

आर्यन पाटीलला उंच उडीत 'सुवर्ण'

। माणगाव । प्रतिनिधी ।

तमिळनाडू कोईमतूर येथे पार पडलेल्या ३८ व्या ज्युनिअर नॅशनल ॲथलॅटीक स्पर्धेत आर्यन पाटील याने पुन्हा एकदा बाजी मारली व महाराष्ट्राला उंच उडीमध्ये सुवर्ण पदक मिळवून दिले. आर्यन अरुण पाटील हा माणगावातील रहिवासी असून त्याचे मूळगाव पेण तालुक्यातील रावे हे आहे.आर्यनचे आई वडील शिक्षक असून नोकरी निमित्त गेली २५ वर्ष ते माणगावातच राहत आहेत. वडील आश्रमशाळेत नोकरी करत असल्याने शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलांच्यात राहून खेळ खेळणे, उड्या मारणे,पळणे आदि उपजत गुण आर्यनच्या अंगी आले.

माझ्या अंगातील काटकपणा या माझ्या आदिवासी मित्रांमुळेच माझ्या अंगी आला असे आर्यन सांगतो.अनेक तालुका, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय खेळात आर्यनने यश संपादन केले आहे.एस. एस निकम माणगाव या शाळेत शिकत असताना ८ वी मध्ये त्याने राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला. आर्यन साई अकॅडमीच्या माध्यमातून पिल्लई कॉलेज रसायनी येथे खेळाबरोबरच एस .वाय.बी. एस.सी. चे शिक्षण पूर्ण करत आहे. कोच इंझमाम आर्यनला उंच उडी खेळासाठी मार्गदर्शन करत आहेत.

आर्यनने आतापर्यंतचे कनिष्ठ राष्ट्रीय सुवर्णपदक २ वेळा, विद्यापीठ राष्ट्रीयस्तर रौप्यपदक १, खेलो इंडिया रौप्य पदक १ , पश्चिम विभाग राष्ट्रीय सुवर्ण पदक २, दक्षिण विभाग राष्ट्रीय सुवर्ण पदक २, फ्रान्स येथील जगातील शाळांच्या स्पर्धेत ५ वे स्थान आदी पदके प्राप्त केली आहेत.भारताला आशियाई व ऑलिम्पिक स्पर्धेत पदक मिळवून देणे हे आर्यनचे स्वप्न आहे. आर्यनच्या यशाचे कौतुक होत आहे.

विराटने मोडले सचिनचे ऐतिहासिक विक्रम

। मुंबई । वृत्तसंस्था ।

शानदार खेळी करत असलेला भारताचा फलंदाज विराट कोहलीने २०११ पासून बाद फेरी सामन्यातील अपयशाचा ठपका वानखेडे मैदानावर पुसून टाकला. न्यूझीलंडविरुद्ध सुरू असलेल्या विश्वचषक २०२३ मधील उपांत्य फेरीच्या लढतीत विराटने महान फलंदाज सचिन तेंडुलकरचे दोन विक्रम मोडले. यामध्ये विश्वचषकातील सर्वाधिक धावांचा आणि एकदिवसीय शतकांचा सचिन तेंडुलकरचा समावेश आहे.

रोहितने विराटला स्थिर होण्यासाठी पुरेसे वातावरण तयार करून ठेवले होते. या संधीचा फायदा त्याने सोडला नाही. आधी गिल आणि नंतर श्रेयस अय्यर सोबत विराटने महत्वाची भागिदारी केली. विराटने २७व्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर या विश्वचषकामधील सहावे अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर ३४व्या षटकात विराटने सचिन तेंडुलकरचा २० वर्षे जुना विक्रम मागे टाकला. सचिनने २००३च्या विश्वचषकामध्ये ६७३ धावा केल्या होत्या.

विश्वचषक क्रिकेटच्या इतिहासात एका स्पर्धेत कोणत्याही फलंदाजाला इतक्या धावा करता आल्या नव्हत्या. २०१९ साली रोहित शर्माने ६४८ आणि डेव्हिड वॉर्नरने ६४७ धावा केल्या होत्या. हे दोन फलंदाजी सचिनच्या जवळ पोहोचले होते. पण त्यांना विक्रम मोडता आला नाही. विराटने या स्पर्धेत २ शतकं आणि ६ अर्धशतकांसह ६७४ हून अधिक धावा केल्या आहेत.

विराट कोहलीची वर्ल्डकप २०२३ मधील कामगिरी

- ऑस्ट्रेलियाविरुद्ध- ८५
- अफगाणिस्तानविरुद्ध- नाबाद ५५
- पाकिस्तानविरुद्ध-१६
- बांगलादेशविरुद्ध- नाबाद १०३
- न्यूझीलंडविरुद्ध- ९५
- इंग्लंडविरुद्ध- ००
- श्रीलंकाविरुद्ध- ८८
- द.आफ्रिकाविरुद्ध- नाबाद १०१
- नेदरलँड्सविरुद्ध- ५१

एका विश्वचषकामध्ये सर्वाधिक धावांचा विक्रम आता विराटच्या नावावर झाला आहे. विश्वचषकामधील सर्वाधिक धावांचा विक्रम मोडल्यानंतर विराट कोहलीने सचिनचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आणखी एक मोठा विक्रम मोडीत काढला. एकदिवसीय सर्वाधिक शतकांच्या सचिनच्या विक्रमाला विराटने मागे टाकले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)